म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

र

मे

९८६५
ग्रं. सं. ठाणें.
धर्म
नं. ९७ /८

'हिंदु यूनियन् क्लब्'
मंडळीच्या आश्रयाखालीं आरंभिलेली
# हेमंतव्याख्यानमाला.

व्याख्यान दुसरें व तिसरें.

विषय,
## शास्त्र व रूढि यांच्या बलाबलाविषयीं विचार.
( पूर्वभाग व उत्तरभाग )

व्याख्यानकार,
नामदार काशिनाथ त्रिंबक तेलंग. सी. आय्. ई.

मुंबईंत
"निर्णयसागर" छापखान्याचे मालक यांणीं छापिलें.
१८८६.

किंमत १॥ आणा.

या व्याख्यानांच्या विक्रीपासून जो कांहीं फायदा राहील त्याचा सत्कार्यी विनियोग करण्याचा संकल्प केला आहे.

टीप—या व्याख्यानावरील सर्व चर्चा निराळी छापण्यांत येईल.

## जाहिरखबर.

# काव्यमाला.

या नांवाचें संस्कृत मासिक पुस्तक गेल्या जान्युअरी महिन्यापासून केलें आहे. यांत उत्तम उत्तम प्राचीन संस्कृत काव्यें, नाटकें, चंपू, भाण, अलंकार इत्यादिकांचा यथावकाश संग्रह होणार आहे. संस्कृत भाषेंत किती ग्रंथ आहेत हें देशोदेशींच्या पुस्तकसंग्रहालयांतील संस्कृत ग्रंथांच्या लिका प्रतिवर्षी सरकाराच्या आश्रयानें छापून प्रसिद्ध होत असतात, त्यांव विदित होतच आहे. त्यांवरून पाहतां आजमितीस छापून प्रसिद्ध झा ह्मणजे सर्व संस्कृतकाव्यभांडाराचा सहस्रांशही होणार नाहीं. हे सर्व ग्रं करणें ही गोष्ट सांप्रत दूरापास्तच. ह्मणून त्यांतून फार प्राचीन आणि असेच ग्रंथ निवडून ते या मालेंत गुंफावे असा आह्मी निश्चय केला आ

ही माला तयार करण्यास आमच्यापाशीं आज किती सामग्री अवश्य आहे. **पंडित दुर्गाप्रसाद** या नांवाचे विद्वान्, बहुश्रुत आणि जयपुरच्या महाराजांचे आश्रयास असतात. यांनीं काश्मीर, पंजाब, बंग मध्यदेश, तैलंगण वगैरे सर्व प्रदेश फिरून नानाप्रकारचे काव्यग्रंथ संपा हे सर्व ग्रंथ प्रायः दुर्मिळ व प्राचीन असून ते प्राप्त करून घेण्यास त्यांस आणि धनव्यय करावा लागला आहे. यांतील कित्येक ग्रंथ तर ८०० किंबहु वर्षांच्याही पूर्वीचे आहेत. आह्मी ठरविलेल्या व्यवस्थेप्रमाणें प्रतिमास होत चालला तरी कनिष्ठपक्षीं १० । १२ वर्षेपर्यंत सहज चालेल इतका यांच्या संग्रहीं आहे! पुढें ही यांचा शोध चालू आहेच. हे सर्व ग्रंथ पं व **रा. रा. काशिनाथ पांडुरंग परब** यांनीं आह्मांस तपासून देण्याचें पतक

ग्रंथ जितके शुद्धरीतीनें छापतां येतील तितके शुद्धरीतीनें छापण्याचा नि यांत प्रायः आजपर्यंत न छापलेल्याच ग्रंथांचा समावेश होईल. क्वचित् प्रा पण फार अशुद्धरीतीनें छापलेले असेही ग्रंथ शुद्धरीतीनें छापले जातील. ज्या टीका उपलब्ध असतील ते ग्रंथ सटीक छापले जातील, परंतु टीकारहित

# ास्त्र व रूढि यांच्या बलाबलाविषयीं विचार.

ापल्या सामाजिक स्थितिसंबंधी सर्व विचारांमध्यें हा विषय नेहमी ात असतो. तेव्हां त्या बद्दल मनन करणें फार आवश्यक आहे, हें ड आहे. पण हा विषय फार कठिण आहे. आणि त्यासंबंधी ीं मतें ह्मणून जीं मी आज सांगणार आहें, त्या सर्वांविषयीं माझ्या ा मुळींच शंका नाहीं, असें देखील मला ह्मणतां येत नाहीं. पण च जें अध्यक्षांनीं सर्व विषयांबद्दल सामान्य रीतीनें सांगितलें, तें येंकरून या विषयास लागू पडतें. ह्मणजे या व्याख्यानमालेंत जीं प्रतिपादन करण्यांत येतील, तीं जशींच्या तशींच सर्वांनीं मान्य क- असा आमचा हेतु नाहीं. तर फक्त हीं व्याख्यानें ऐकून त्यांतील ांबद्दल आपल्या मंडळीमध्यें विचार आणि ऊहापोह व्हावा, हाच हेतु आहे. असो.

स्त्र व रूढि यांच्या बलाबलाविषयीं दोन मतें आहेत. एका मता- शास्त्रविरुद्ध रूढि सर्वथा त्याज्य आहे. आणि दुसरें असें कीं, रूढि बलीयसी. तिसरा एक पक्ष आहे कीं, शास्त्र आणि रूढि न जरूर पडेल तेव्हां झुगारून द्यावीं. पण या पक्षाचा आज वि- तव्य नाहीं. आतां या मतांचा विचार करतांना, पहिल्यानें आ- या प्रमाण मानिलेल्या ग्रंथांत त्याविषयीं काय सांगितलें आहे, तें पाहूं न्यास, त्या ग्रंथांमध्येंही मतभेद बराच आढळतो. उदाहरणार्थ एथें हीं वचनें दाखल करितों. यांत वैदिक वचनांबद्दल शोध केला नाहीं, ुख्य कारण हें कीं, आपण आपला धर्म वेदमूलक ह्मणून जरी णतों, आणि असें ह्मणणें अंशतः जरी खरें आहे, तथापि वस्तुतः व्य- ार जो हल्लीं प्रचारांत आहे, त्याचें मूल स्मृतिपुराणादि ग्रंथांतच ुतांशीं सांपडतें. याला एक उत्कृष्ट प्रमाण ह्मटलें ह्मणजे, आमचे म पूज्य गुरु प्रसिद्ध पंडित कैलासवासी यज्ञेश्वर शास्त्रीबावा यांच्या ार्यविद्यासुधाकरनामक ग्रंथांत जें आपल्या धर्माच्या सांप्रतच्या स्थि- चें वर्णन केलें आहे, त्यांत मिळेल. त्यांत प्रमाणें बहुतेक स्मृत्यादिक ग्रंथांतलींच आहेत. असो. या विषयास लागू करण्यासारिखीं एकदोन देक वचनें रा० सा० मंडलिक यांनीं केलेल्या नवीन हिंदुधर्मशास्त्रा-

वरील ग्रंथांत संस्कारकौस्तुभांतून दिलीं आहेत. पण त्यांविषयीं अधिक बोलण्याची आतां जरूर नाहीं. स्मृतिवचनें मात्र आतां सांगतों. मनुस्मृति ही स्मृतींमध्यें अग्रगण्य. तींत **श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः** अशीं चार धर्मप्रमाणें सांगितलीं आहेत. त्यांत क्रमाक्रमानें बळ कमी कमी होत जातें असा अभिप्राय दिसतो. ह्मणजे सर्वांत जास्त वजन श्रुतीचें, त्याच्या खालोखाल स्मृतींचें, आणि त्याच्याही खालीं सदाचाराचें असें मनूचें मत दिसतें. आठव्या अध्यायांत **जातिजानपदान्धर्माञ्छ्रेणीधर्मांश्च धर्मवित् । समीक्ष्य कुलधर्मांश्च स्वधर्मं प्रतिपादयेत् ॥** असें वाक्य आहे. तें रूढिपक्षाचें असें कांहीं लोक मानितात. पण त्यांत आणि पूर्वींच्या वाक्यांत कांहीं विरोध नाहीं. राजानें जातिधर्म वगैरे यांचा तपास करावा, इतकेंच त्या वाक्यांत सांगितलें आहे. परंतु ते श्रुतिस्मृतिविरुद्ध असल्यास देखील त्या धर्मांप्रमाणें निर्णय करावा असें ह्मटलें नाहीं. वसिष्ठस्मृति कांहीं निबंधांत आढळते ती अशी. **देशधर्मजातिधर्मकुलधर्मान् श्रुत्यभावादब्रवीन्मनुः;** हेमाद्रिकृतग्रंथांत **श्रुतिस्मृतिविहितो धर्मस्तदलाभे शिष्टाचारः प्रमाणम्** अशी वसिष्ठस्मृति आहे ह्मणून ह्मटलें आहे. आणि दोन्ही सूत्रें आपल्या प्रतींत सांपडतात. दोन्हींचाही आशय एकच. ज्या गोष्टींविषयीं श्रुतिप्रमाण नाहीं, त्यांविषयीं शिष्टाचारास वजन आहे. अर्थात् जेथें श्रुति आहे, तेथें श्रुतिच प्रमाण मानिली पाहिजे, असा वसिष्ठस्मृतीचा अभिप्राय दिसतो. गौतमस्मृतींत (वीरमित्रोदयकारानें आपस्तंब ह्मटलें आहे ती चूक आहे.) **देशजातिकुलधर्माश्चाम्नायैरविरुद्धाः प्रमाणम्** असें वाक्य आहे. तेंही तशाच अर्थाचें आहे. बौधायनस्मृतींत गौतममताचें अवतरण देऊन तेंच मान्य केलें आहे असें दिसतें. कात्यायनाचें वचन असें आहे—**यस्य देशस्य यो धर्मः प्रवृत्तः सार्वकालिकः । श्रुतिस्मृत्यनुरोधेन देशदृष्टः स उच्यते ॥.** यावरून देशदृष्टहेतूंचा तपास करून राजानें निर्णय करावा, असें मनुस्मृतींतलें जें वाक्य आहे, त्याचा अर्थ शास्त्रपक्षास अनुकूल असाच होतो, रूढिपक्षास अनुकूल नाहीं. आपस्तंब एके ठिकाणीं ह्मणतात. **धर्मज्ञसमयः प्रमाणं वेदाश्च.** त्याचा अर्थ टीकाकार असा लावतो कीं, आह्मां सामान्य लोकांना धर्मज्ञलोकांचा आचार प्रमाण, आणि त्या

धर्मज्ञांना वेद प्रमाण. दुसरीकडे आपस्तंबांनीं **एतेन देशकुलधर्मा व्याख्याताः** असें ह्मटलें आहे, त्याचाही अर्थ असाच कीं, शास्त्रास अविरुद्ध कुलधर्म वगैरे मान्य आहेत, दुसरे नाहींत. याज्ञवल्क्यस्मृतींत मनूचीं चार प्रमाणें देऊन, **सम्यक्संकल्पजः कामः** ह्मणून एक पांचवें घातलें आहे. परंतु **अस्वर्ग्यं लोकविद्विष्टं धर्ममप्याचरेन्न तु** असेंही त्या स्मृतींत वचन आहे. त्या वचनाचा आणि **यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयं नो करणीयम्** असें जें वचन हल्लीं फार प्रचारांत आहे, त्याचा अर्थ जवळजवळ सारिखाच दिसतो. आणि त्यांत शास्त्रनियमांवर वर्चस्व कांहीं अंशीं लोकसमजुतीस दिलें आहे. तसेंच जिंकिलेल्या देशाबद्दल, **यस्मिन्देशे य आचारो व्यवहारः कुलस्थितिः। तथैव परिपाल्योऽसौ यदा वशमुपागतः॥** असें वचन आहे. पण त्यावर देखील **यदि शास्त्रविरुद्धो न भवति** असें विज्ञानेश्वरांचें ह्मणणें आहेच. आणखी एक वचन या पक्षाचें आहे, त्यांत त्या पक्षाचें युक्तीनें समर्थन केलें आहे, तें असें. **स्मृतिमूलो हि सर्वत्र शिष्टाचारस्ततोऽत्र च। अनुमेया स्मृतिः स्मृत्या बाध्या प्रत्यक्षया तु सा ॥** हें गोभिलगृह्यसूत्रावरील टीकेंत दिलें आहे. याचा अर्थ समजण्याला इतकें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, आपल्या मीमांसेप्रमाणें शिष्टाचार किंवा सदाचार याला जें वजन आहे, तें त्या आचारावरून शास्त्राचें अनुमान काढून, त्या शास्त्रास जें वजन असावें तेंच आचारास असलें पाहिजे, अशा युक्तीवरून प्राप्त झालें आहे. ह्मणजे शिष्टाचारास स्वतः प्रामाण्य नाहीं. पण शास्त्रग्रंथ सर्व उपलब्ध नसल्यामुळें, शिष्टाचारास अनुकूल शास्त्रग्रंथ नष्ट झाले आहेत. ते ग्रंथ मिळाले असते, तर ते अनुकूल नियम सांपडले असते. पण ते ग्रथ नसतांही तसे नियम आहेत असें समजून चाललें पाहिजे. आणि वरील वचनांत असें ह्मटलें आहे कीं, जेथें प्रत्यक्ष स्मृति एका अर्थाची सांपडते, तेथें वर दर्शविलेल्या रीतीनें शिष्टाचारावरून अनुमित स्मृतीचें प्रामाण्य मानितां येत नाहीं. या मतावर दोन प्रकारचे आक्षेप निघतात. ते असे कीं, शिष्टाचारावरून शास्त्र अनुमित करावयाचें खरें; पण तें शास्त्र स्मृतिरूप नव्हे; तर मुक्तावलीकाराच्या मताप्रमाणें श्रुतीच. आणि अशा प्रत्यक्ष आणि अनुमित स्मृतींमुळें विकल्प मानिला, तरी चालण्यासारिखें आहे. असो, आतां उलटपक्षाचीं वचनें पाहूं या. आश्वलाय-

नगृह्यसूत्रामध्यें **अथ खलूच्चावचा जनपदधर्माश्च तान्विवाहे प्रतीयात् । यत्तु समानं तद्वक्ष्यामः ॥** अशीं दोन सूत्रें आहेत. यांतून टीकाकारानें सूत्रांस विरुद्ध नाहींत असेच देशधर्म वगैरे करावे, असा अर्थ काढिला आहे. परंतु तसें सूत्रांत निदान कंठतः तरी उक्त नाहीं. मनुस्मृतींत ह्मटलें आहे कीं, **सद्भिराचरितं यत्स्याद्धार्मिकैश्च द्विजातिभिः । तद्देशकुलजातीनामविरुद्धं प्रकल्पयेत्** हें पूर्वोक्त याज्ञवल्क्य॥ वचनाशीं कांहीं अंशीं जुळतें. बृहस्पतिस्मृति अशी आहे— **देशजातिकुलानां च ये धर्माः प्राक्प्रवर्तिताः । तथैव ते पालनीयाः प्रजा प्रक्षुभ्यतेऽन्यथा ॥**. एथें हें सांगितलें पाहिजे कीं, शास्त्रपक्षाच्या निबंधकारांनीं या बृहस्पतिस्मृतींत एक खुबी काढिली आहे, ती अशी. **प्रजा प्रक्षुभ्यतेऽन्यथा** असे शब्द त्या स्मृतींत असल्यामुळें, केवळ प्रजाक्षोभ वारण्याकरितां राजानें असे आचार पाळावे, इतकाच त्या वचनाचा आशय आहे; पण त्या अनाचारापासून पातक घडत नाहीं असें त्या वचनांत कोठेंही सांगितलें नाहीं. ही खुबी कितपत ग्राह्य आहे, याविषयीं आतां विशेष ऊहापोह करण्यास अवकाश नाहीं. मामाच्या मुलीशीं लग्न करणें जरी शास्त्रविरुद्ध आहे, तथापि देशाचारास वगैरे अनुसरून करण्यास चिंता नाहीं, असें वर दाखल केलेल्या बृहस्पतिस्मृतींतील श्लोकांच्या पुढील श्लोकांत प्रतिपादन केलें आहे. याशिवाय स्मृतिरत्नाकर, संस्कारकौस्तुभ, धर्मसिंधु, वगैरे आधुनिक निबंधांमध्यें रूढिपक्षाची जास्त मातबरी मानिली आहे, आणि त्यांत भृगु व देवल या स्मृतिकारांचीं वचनें हीं नमूद केलीं आहेत. व्यवहारमयूखांत, **देशाचारानप्यलोचयेदित्याह बृहस्पतिः**, असें ह्मणून वर उतरून घेतलेली बृहस्पतिस्मृतींतील उक्ति दाखल केली आहे. रा. सा. मंडलिक यांनीं तर रूढिपक्षच उचलला आहे. पण आज प्रथम दाखल केलेल्या वाक्यांची त्यांच्या ग्रंथांत मीमांसा केलेली आढळत नाहीं.

वरील सर्व वचनांचा तपास करतां असें दिसून येईल कीं, त्यांचे दोन वर्ग होतात इतकेंच नाहीं, तर एक एका वर्गांतल्या वचनांमध्यें देखील कांहीं ठिकाणीं सूक्ष्म भेद दृष्टीस पडतो. तेव्हां या प्रमाणवाक्यावरून सिद्धांत कसा काढतां येईल ? आपली स्थिति एका प्राचीन श्लोकांत सांगितल्याप्रमाणेंच होते. **कपिलो यदि धर्मज्ञः सुगतो नेति का**

**प्रमा। तावुभौ यदि सर्वज्ञौ मतिभेदः कथं तयोः ॥** कपिल जर सर्वज्ञ तर बुद्धालाही सर्वज्ञ ह्मटलें पाहिजे. आणि दोघेही जर सर्वज्ञ ह्मणावे, तर त्यांच्या मतांत विरोध कसा? या सवालास जबाब देणें कठिण आहे.

आतां शास्त्रमीमांसेपासून जर एक समर्पक ठराव होत नाहीं, तर आपला पूर्वापार व्यवहार कसा काय चालत आला आहे हें इतिहासावरून पाहूं या. **तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम्। धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पंथाः ॥** हें प्रसिद्ध धर्मराजवाक्य सर्वांना मान्यच आहे, तर आपल्या देशांतील महाजन कोणच्या मार्गानें गेले हें पाहूं या. तेणेंकरून आपल्यालाही मार्ग कोणचा धरावा हें कदाचित् कळेल. याबद्दलची माहिती इतिहासांतून मिळविली पाहिजे. त्या माहितीवरून एथें सात आठ मुद्दे मी काढिले आहेत, पण त्या विषयीं आज बारकाईनें विचार करतां येत नाहीं. या व्याख्यानाच्या दुसऱ्या भागांत तो विचार करावा लागेल. एथें केवळ त्या माहितीचें दिक्प्रदर्शन करितों. आतां पहिला मुद्दा असा कीं, **परधर्मो भयावहः** असें गीतेंत वाक्य आहे हेंच शास्त्र, पण प्राचीन इतिहासावरून ब्राह्मणांनीं क्षत्रियकर्माचा स्वीकार केला, क्षत्रियांनीं ब्रह्मकर्माचा केला, असें द्रोण, अश्वत्थामा, परशुराम, जनक, विश्वामित्र, यांच्या चरित्रांत दिसून येतें. तसेंच छांदोग्य उपनिषदांत, मधुविद्या व पंचाग्निविद्या क्षत्रियांपासून ब्राह्मण शिकले, अशी आख्यायिका आहे. आणि गीतेंत मोठा जो योग ह्मणून सांगितला आहे तोही क्षत्रियांच्या मार्फतच सर्व पृथ्वीवर पसरला. **इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्** इत्यादि वचनांत विद्यापरंपरा श्रीकृष्णांनींच सांगितली आहे. आलिकडील इतिहासांत पेशवे वगैरे यांच्या चरित्रांत तरी तोच प्रकार दिसून येतो. रामशास्त्री बावांची गोष्ट प्रसिद्ध आहे. ते एके दिवशीं श्रीमंतांच्या वाड्यांत गेले असतां, पेशवे जप करण्यांत गुंतलेले असल्यामुळें त्यांची मुलाखत होण्यास उशीर लागला; ह्मणून रामशास्त्रीबावांनीं भेटीच्या वेळेस असें ह्मटलें कीं, आतां क्षत्रियधर्माचा अंगीकार केल्यावर ब्रह्मकर्माचरणामुळें हातीं घेतलेल्या कामास व्यत्यय येईल असें वर्तन करतां नये. तसेंच श्रीकृष्ण व अर्जुन यांनीं केलेला मामांच्या मुलीशीं विवाह. हा शास्त्रविरुद्धच. द्रौपदीविवाहाची तरी हीच गत. तो शास्त्रविरुद्ध ह्मणून कबूल

करावें लागतेंच. तेव्हां त्याचें समर्थन कुमारिल स्वामींनीं असें केलें आहे. **यौवनस्थैव कृष्णा हि वेदिमध्यात्समुत्थिता। सा च श्रीः श्रीश्च भूयोभिर्भुज्यमाना न दुष्यति॥.** तात्पर्य हें कीं, द्रौपदी ह्मणजे लक्ष्मी असेंच समजलें पाहिजे; आणि तसें समजल्यास या विवाहांत दोष नाहीं! **न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि** असा निषेध स्पष्ट असतांना, बाकीचे लोक तर काय पण भट्टभिक्षुक देखील आपल्या मुलांना इंग्रजी भाषा शिकावयाला लावीत आहेत, आणि वैदिक विद्येचा एका प्रकारें ऱ्हास होत आहे. सुरापान तर महापातक ह्मणून छांदोग्योपनिषदांत देखील सांगितलें आहे, पण काश्मीरांतील नीलमतपुराणांत बुह्लरसाहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें तें निषिद्ध नाहीं. आणि तेथेंच ब्राह्मणांस मांसाहार निषिद्ध नाहीं हा पक्ष देशाचार ह्मणून कांहीं लोक हल्लीं घेतात इतकेंच नाहीं, तर बौधायन सूत्रांत देखील अशा आचारांचा उल्लेख आहे. आणखी एक मुद्दा सांगतों, कारण अलिकडील एका वादाच्या संबंधानें तो मनन करण्याजोगा आहे. मनूनें ह्मटलें आहे—**त्रिंशद्वर्षो वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम्। अष्टवर्षोऽष्टवर्षां वा धर्मे सीदति सत्वरः॥** ह्मणजे ३० वर्षांच्या पुरुषानें अथवा २४ वर्षांच्या पुरुषानें १२ किंवा ८ वर्षांच्या मुलीशीं लग्न करावें. यापेक्षां लवकर केल्यास धर्महानि होते. यावर यज्ञेश्वर शास्त्रीबावांनीं ह्मटलें आहे कीं, जास्त वय झाल्यास लग्न करूं नये, असा यांतला अर्थ नाहीं, तर **न्यूनवयस्कानां तु विवाहो धर्महानिकर एव मनुना स्पष्टमेव तथाभिधानात्,** ह्मणजे या वचनांत जें वय सांगितलें आहे, त्यापेक्षां कमी वयांत लग्न केल्यास धर्महानि होते. आतां या वाक्याप्रमाणें हल्लीं व्यवहार कितपत चालत आहे त्याविषयीं कांहीं बोलणें नलगे. या उदाहरणांपैकीं कांहींकाविषयीं कदाचित् एक युक्ति काढण्यांत येईल. **न देवचरितं चरेत्** असें एक वचन पुष्कळवेळां ऐकण्यांत येतें. हें कोठून घेतलें आहे तें मला माहित नाहीं, तेव्हां त्याच्या प्रामाण्याप्रामाण्याबद्दल विचार अपुरताच होणार. पण माझी समजूत अशी आहे कीं, हें कोणी तरी भित्र्या मनुष्यानें लिहिलें असावें. देवचरिताविषयीं पूर्ण भरंवसा ज्याचा असेल, तो असें सहसा ह्मणणार नाहीं. मीं गीतेंतलेंच वाक्य आदरणीय असें मानितों. त्यांत श्रीकृष्णांनीं काय

ह्मटलें आहे? **यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः। स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते। न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन। नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि। यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः। मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः॥.** तात्पर्य काय कीं, ईश्वराच्या आचरणासारिखें आचरण करण्यास एथें निषेध नाहीं. उलट तसें आचरण होईलच होईल, ह्मणून श्रीकृष्ण ह्मणतात. मला कांहीं कर्तव्य नसतांना मी कर्मांत मग्न आहें, कारण कर्महानि झाल्यास लोकांचा नाश होईल.

असो, याप्रमाणें शास्त्र व इतिहास या दोहोंचाही तपास करतां त्यांतून एक नियम ह्मणून काढणें कठिण दिसतें. परंतु वरील सर्व मुद्द्यांचा विचार केल्यास दोन तऱ्हेचे सिद्धांत निघतात असें मला वाटतें. आतां एथें मतभेदाला पुष्कळ जागा आहे हें मी जाणतों. आणि पूर्वीं सांगितल्याप्रमाणें मीं जें माझें मत ह्मणून सांगतों, तेंच सर्वांनीं मान्य करावें असा माझा आग्रह नाहीं. पण माझें मत मी सांगतों, आणि मग त्याविषयीं ऊहापोह करून वर दर्शविलेल्या सर्व प्रमाणांची एकवाक्यता मी ह्मणतों त्या रीतीनें करावयाची, किंवा दुसऱ्या रीतीनें, हें सर्वजण आपापल्या बुद्धीप्रमाणें ठरवितीलच.

माझ्या मतें मूळ शास्त्रकारांचा हेतु असाच असावा कीं देश, काल, वर्तमान यांकडे लक्ष्य देऊन धर्मशास्त्रनियमांत वेळोवेळीं शिष्टांनीं विचार करून फेरफार करावे. कांहीं वचनें जीं शिष्टाचारास अनुकूल नाहींत तीं मूळ शास्त्रकारांच्या अभिप्रायासही अनुसरून नाहींत, असा माझा समज आहे. हा सिद्धांत जर खरा नसला, तर नास्तिक नाहीं, पाखंडी नाहीं, तर धार्मिक, शिष्ट, व मान्य, अशा मनुष्याच्या हातून झालेलें जें आचरण भारतादि ग्रंथांवरून आपणाला कळून येतें, त्याचा खुलासा कांहीं होऊं शकत नाहीं. आणि हा पक्ष खरा असल्यास, त्यांत आपल्या स्मृतिकारांचा शहाणपणा व दूरदर्शीपणा दिसून येतो. त्यांना माहित होतें कीं, जे धर्मनियम एकस्थितींत सोईवार असतात, ते स्थित्यंतर झाल्यास प्रतिबंधक होऊन असुखास कारणीभूत होण्याचा संभव असतो. आणि स्मृति तर वेळच्या वेळीं होण्याला

ऋषि कोठून मिळणार? इंग्रजी रीतीप्रमाणें आज कायदा झाला, दहा वर्षांनीं त्यापासून गैरसोई होते असें दिसलें कीं, तो रद्द करून दुसरा करतां येतो. तसें स्मृतींचें नाहीं, ह्मणून कांहीं तरी मर्यादा तर राहावी, आणि त्या मर्यादेपासून जनसुखास तर व्यत्यय येऊं नये, असा हेतु मनांत धरून त्यांनीं हे धर्मज्ञसमय, शिष्टाचार, यांच्या प्रामाण्याबद्दल निर्णय करून ठेविले असावे. हें स्पष्ट रीतीनें सिद्ध करणारीं प्रमाणें देतां येत नाहींत, पण या पक्षास कांहीं अंशीं उपोद्बलक, असे कांहीं शास्त्राधारयुक्त विचार दाखल करितों.

**अन्ये कृतयुगे धर्मास्त्रेतायां द्वापरे परे। अन्ये कलियुगे नृणां यूगह्रासानुरूपतः॥** असें मनुवचन आहे. निरनिराळ्या युगांत निरनिराळे धर्म असावयाचे. हें कां? देशकालवर्तमान या संबंधानें जर धर्मांत फेरफार होणें रास्त नाहीं, तर जें सत्ययुगांत विहित, आणि जें त्या युगांत निषिद्ध, तेंच आमच्या ह्या कलियुगांत विहित व निषिद्ध असावें. तसेंच, देशाचार वगैरे शास्त्रसंमत कांहीं अंशीं तरी आहेतच; त्यांतलें तरी बीज हेंच. तसेंच आपल्या आलिकडील निबंधांत कलिवर्ज्यप्रकरण ह्मणून एक असतें; टीकाकार कांहीं वचनांवर **अयं विधिर्युगांतरविषयः** असें ह्मणत असतात; याचाही खुलासा वर सांगितलेल्या न्यायानेंच होतो. याशिवाय दुसरें एक प्रमाण घ्या. मागें पुरुषमेधाची चाल आपल्या देशांत होती, असें यज्ञेश्वर शास्त्रीबावांच्या आर्यविद्यासुधाकरांत सिद्ध करून दिलें आहे. समांसमधुपर्क, वगैरे प्रकारही प्रचारांत होते. आतां ते सर्व जाऊन पिष्टपशूची चाल जी पडली आहे, ती कशी? पुष्कळांचें ह्मणणें आहे कीं, हें बौद्धधर्माच्या मुळें झालें असावें. हें मला कांहीं अंशीं खरें वाटतें. पण तें कसेंही असो. हा अलिकडला चहूंकडे अंगीकृत धर्म हा देशकालवर्तमानानुरोधानें प्राचीन धर्माच्या ऐवजीं प्रचारांत आला आहे, हें उघड आहे. पण इतकें कशाला पाहिजे? हल्लींची आमची सर्व जी धर्मव्यवस्था ही थोड्याच अंशीं वेदमूलक, आणि पुष्कळांशीं स्मृतिमूलक, अथवा पुराणमूलक आहे. तर हा जो मोठा फेरफार झाला आहे, याचें तरी समर्थन दुसऱ्या कोणच्या रीतीनें होऊं शकतें? तर या सर्व वचनांचा, युक्तीचा, आणि ऐतिहासिक माहितीचा, विचार करतां, त्या सर्वांतलें तत्त्व हेंच घ्यावयाचें कीं, देशकालवर्तमानाच्या अनुरोधानें

शिष्टांनीं धर्मनियमांमध्यें फेरफार प्रचारांत आणावे. आणि मग **यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥** ( श्रेष्ठ लोकांच्या आचरणाप्रमाणें सामान्य जन वर्तन करीत असतात. आणि त्यांनीं जें प्रमाण ह्मणून मान्य केलें, त्यास सर्व अनुसरून चालतात. ) या गीतेंतील वचनाप्रमाणें सर्व व्यवस्था सुरळीत चालण्यास ठीक पडेल. हा अधिकार मात्र शिष्टांकडे असला पाहिजे. ज्यांना शास्त्र किंवा रूढि यांच्या नियमांतील खुब्या कळतात, व त्यांविषयीं समंजसतेनें विचार करण्यास जे समर्थ असून तयार आहेत, त्यांनीं हें केलें पाहिजे. नाहीं तर सर्व धरबंध सुटून अनाचार सर्वत्र प्रसृत होईल, असा मूळ शास्त्रकारांचा अभिप्राय दिसतो.

हा सिद्धांत जर खरा असला, तर त्यापासून व्यवहारांतही उपयोग आहेच. उपयोग आहे ह्मणून सिद्धांत खरा माना असें माझें ह्मणणें आहे. मानणें न मानणें हें सिद्धांताच्या सत्यासत्यत्वावर आहे. पण त्यापासून उपयोग आहे, ही एक ध्यानांत ठेवण्यासारिखी गोष्ट आहे. **यथा आम्रे फलार्थे निर्मिते छायागंधावित्यनूत्पद्येते** या आपस्तंबोक्त न्यायाप्रमाणें ही गोष्ट आहे. आंब्याचें झाड आपण लावितों फळासाठीं, पण त्यापासून छाया आणि सुवास हीं आपल्याला मिळतातच. तसें हा सिद्धांत जर खरा असला, तर त्याच्या सत्यत्वाकारितां त्याचें ग्रहण करावें, आणि मग त्यापासून हा एक लाभ होणार आहे कीं, कितीही स्थित्यंतरें झालीं तरी धर्मनियम, जनसुखास प्रतिबंधक होणार नाहीं. जशी जशी स्थिति बदलत जाईल, तसतसे नियमांत विचारपूर्वक फेरफार करण्याचें काम धर्मज्ञ शिष्टजनांकडे येत जाईल. केवळ आजच्या आपल्या स्थितींत मात्र या सिद्धांतापासून फायदा आहे असें नाहीं, तर तो खरा असल्यास पुढेंही सर्वकाल त्याचा अंमल चालणार आहे, आणि पुढील प्रजेसही सुधारणेच्या कार्यांत अडचणी कमी येतील.

मागल्या खेपेच्या व्याख्यानांत जो विषय आला त्याचा पहिल्यानें गोषवारा देऊन मग व्याख्यानाच्या उत्तरभागास आरंभ केला असतां ठीक पडेल. मागील व्याख्यानांत निरनिराळ्या प्राचीन शास्त्रकारांच्या मतांचा थोडक्यांत उल्लेख केला, आणि त्यांच्या मतांचे निरनिराळे प्रकार दाखविले. एकंदरीमध्यें त्यांच्या मतांचे दोन वर्ग केले. पहिल्या वर्गामध्यें शास्त्राचें आणि शास्त्रास अविरुद्ध अशाच रूढीचें प्रामाण्य प्रतिपादन करणारीं वचनें दाखविलीं. दुसऱ्या वर्गामध्यें रूढि कशीही असली, तरी मान्य आहे, अशाप्रकारच्या आशयाचीं वाक्यें दाखविलीं. त्यांतही पुनः एकएका वर्गांतील सर्वांचीं मतें सारखींच नाहींत तर त्यांमध्येंही सूक्ष्म भेद आहे असें सांगितलें. याप्रमाणें स्मृतिवचनांचा विचार करून मग आपले प्राचीन भारतादि इतिहास यांतील माहितीवरून व्यवहारामध्यें कोणकोणत्या रीतीनें धर्मज्ञ लोकांचें वर्तन चालत आलें आहे हेंही दाखविलें. उत्तरभागाशीं या गोष्टीचा संबंध विशेष असल्यामुळें, तिच्याविषयीं केवळ दिक्प्रदर्शनच केलें, आणि दोन्ही प्रकारचे विचार केल्यानंतर त्यांतून निष्कर्ष काय निघतो हें पाहिलें. तो निष्कर्ष माझ्या मतें असा निघाला कीं, **“शास्त्र आणि रूढि”** हीं वेळोवेळीं बदलत असावीं, असेंच सर्व प्रमाणांच्या एकवाक्यतेकरितां कबूल करावें लागतें. आणि हाच सिद्धांत निदान कांहीं अंशीं शास्त्रसंमत आहे, हें दाखविण्याकरितां स्मृतींतील वचनें काढून त्यांचे आधार दाखविले. उदाहरणार्थ **“अन्ये कृतयुगे धर्मास्त्रेतायां द्वापरे परे । अन्ये कलियुगे नृणां युगह्रासानुरूपतः ॥”** अशा प्रकारचीं मनु आणि इतर शास्त्रकारांचींही वचनें सांगितलीं. आणि हा प्रकार जर खरा ठरला, तर ह्यापासून सांप्रतच्या काळीं व पुढेंही केवढा मोठा उपयोग होणार आहे हेंही दर्शविलें. आणि आपल्या शास्त्रकारांचें चातुर्य आणि दूरदृष्टि हीं वर्णनीय आहेत असें यावरून सिद्ध होईल, इत्यादि प्रकार सांगितले.

आतां व्याख्यानाच्या पुढील भागास आरंभ करितों. या भागामध्यें कांहीं अंशीं मागल्याच भागांतील सिद्धांताचें रूपांतर आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि कांहीं अंशीं भिन्नता आहे खरी. पहिला मार्ग जसा शास्त्रसंमत आहे तसाच हाही कांहीं अंशीं शास्त्र-

ता. ८१ ५८०



संमत आहे असेंच माझें ह्मणणें आहे. आणि व्यवहारामध्यें दोहोंचाही परिणाम सारखाच होणार आहे. पण मागच्या खेपेस जीं ऐतिहासिक प्रमाणें सांगितलीं त्यांवरून, व शास्त्रकारांचीं वचनें पाहून, शास्त्रकारांचा सिद्धांत काय असावा याचें अनुमान काढण्याचा यत्न केला. आतां केवळ ऐतिहासिक लेखांवरून धर्माधर्माबद्दल सिद्धांत काढावयाचा आहे, प्रत्यक्ष शास्त्रावरून नाहीं. ह्मणजे, "**महाजनो येन गतः स पंथाः**" हेंच शास्त्र समजून, महाजनांचें वर्तन कसें होतें याचा विचार करावयाचा आहे. याकरितां मागें जीं ऐतिहासिक प्रमाणें दाखविलीं त्यांविषयीं एथें कांहीं प्रकारें विशेष विवरण केलें पाहिजे. मागच्या खेपेस जे सात प्रकार सांगितले त्यांत असे मुद्दे होते.

१ पहिला मुद्दा.—द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कृपाचार्य, परशुराम इत्यादि जे मान्य पुरुष होऊन गेले ते ब्राह्मण असतां त्यांनीं क्षात्रधर्माचें आचरण केलें. हें त्यांनीं कसें केलें? येणेंकरून यांच्या ब्राह्मणत्वाची हानि कशी झाली नाहीं? क्षात्रकर्म हें स्मृतीप्रमाणें ब्राह्मणांना विहित नाहीं, निषिद्धच आहे. अध्यापनाचा अधिकार हा स्मृतीप्रमाणें पाहतां ब्राह्मणांनाच आहे, इतरांना नाहीं. असें असतां अध्यापन क्षत्रियांनीं केल्याचीं उदाहरणें आहेत तीं गीतेंतून व छांदोग्यउपनिषदांतून मागील खेपेस दाखविलीं. तसेंच जनक व विश्वामित्र यांच्या परधर्माश्रयणाविषयींही सांगितलें.. आलिकडे पेशवे, पटवर्धन, रास्ते, यांविषयींही मागील व्याख्यानांत सांगितलेंच होतें. याशिवायही प्राचीन लेखांमध्यें कित्येक ठिकाणीं विधिभंगाचीं उदाहरणें दिसतात. पाणिनीच्या सूत्रावरून "**आयुधजीवी**" ब्राह्मणाची एक जात होती असें दिसतें; यांचा आचार क्षत्रियांचा आणि जात तर ब्राह्मण. असे ब्राह्मण पंजाबांत होते. पूर्वींचे द्रोणाचार्यादि हे क्षात्रधर्मानें वागणारे पण फक्त व्यक्तिरूपानेंच काय ते; परंतु ही सर्व जातच क्षात्रधर्मानें वागणारी. असें असून त्यांना पाणिनिमुनि "**ब्राह्मण**" ह्मणतात. आलिकडे डाक्टर बुलर हे बौधायनसूत्राच्या संबंधानें लिहित असतां ह्मणतात कीं, पंजाबांत अद्यापि असे ब्राह्मण आहेत. ते जातीनें ब्राह्मण, परंतु इंग्रज सरकारच्या आणि एतद्देशीय संस्थानिक वगैरे इतरांच्याही नोकरीमध्यें राहून शिपाईगिरी करीत असतात. तेव्हां यांतील मुख्य गोष्ट ही कीं,

द्रोणाचार्य, परशुराम वगैरे, तसेंच जनक, मनु, इक्ष्वाकु, तसेच पाणिनीनें सांगितलेले आयुधजीवी ब्राह्मण, या सर्वांचें वर्तन पाहतां, शास्त्रीय विधीचा भंग तर झालाच, पण त्यांच्या ब्राह्मणत्वादिकाची हानि झाली असें लोकांनीं मानिलें नाहीं.

२ कृष्ण व अर्जुन यांनीं मातुलकन्यापरिणय ह्मणजे मामाच्या कन्येशीं विवाह केला. शास्त्रामध्यें तर "**असपिंडाम्**" इत्यादि नियम आहेत, त्यांप्रमाणें पाहतां मातुलकन्याही सपिंडांत येते. परंतु या विधीचा भंग, मान्य अशा थोर पुरुषांनीं केला. आणि आतां कशी स्थिति आहे ती पहा. कित्येक जातींमध्यें मामाची कन्या करणें हाच मुख्य पक्ष झाला आहे. ह्मणजे नियमाचा भंग हाच मुख्य पक्ष, हाच विहित मार्ग मानला जातो. आणखी एक गोष्ट या संबंधानें ध्यानांत ठेवण्यालायक आहे. ती ही कीं, आधुनिक निबंधकार वगैरे यांनीं हा देशाचार आहे असें ह्मणून याचें समर्थन केलें आहे. ज्या देशाचा अनुकूल आचार असेल त्या देशीं असा विवाह ठीक आहे, अन्य देशीं पातक, असें कौस्तुभकार ह्मणतो.

३ "**न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि**" असें वाक्य आहे. परंतु आमचे आचार्य बावा ( भीमाचार्य ) तर उपहासामध्यें सुद्धां यावनी भाषेचा उपयोग करितात. ( सर्व हंसले ) इतर कित्येक लोक पोट भरण्यासाठीं तिचा उपयोग करितात. दुसरें "**यथैवान्यायविज्ञाताद्वेदाल्लेख्यादिपूर्वकात् । शूद्रेणाधिगताद्वापि धर्मज्ञानं न संमतम् ॥**" असें एक वचन आहे. लिहिलेल्या पुस्तकावरून केलेलें अध्ययन व वेदज्ञान शास्त्रकर्त्यांना कबूल नाहीं. परंतु आजकाल पाहिलें तर कांहीं विद्वानांच्या आचरणांत वेगळा प्रकार आहे. तेही आलिकडचे "पाखंडी" नव्हत, तर मोठे शास्त्री. त्यांपैकीं एकानें परवां माक्समूलर यानें छापलेल्या वेदार्थप्रकाशाचें पुस्तक मजकडून मुद्दाम मागून नेलें. हें कसें ? जे मोठे पंडित, शिष्ट, आपल्याला प्राचीन प्रकारचे ह्मणविणारे, नवीन प्रकारांचा ज्यांना गंधही नाहीं, अशा लोकांकडून आणि अशा नियमाचा भंग होतो.

४ सुरापानाविषयीं मागें सांगितलेंच आहे. परंतु सांप्रतची स्थिति कशी आहे ती पहा. सुरापान हें पंचमहापातकांतलें एक महापातक

मानलेलं असतांना, काश्मीर देशांतील नीलमत-पुराणांत त्याचा निषेध नाहीं असें बुह्लर साहेब ह्मणतात. बरें आपल्याकडे तें कृत्य करणारांना जातीकडून शिक्षा मिळत नाहीं, जनांत निंदा झाली तरी ती हळूहळू होत्ये. शिवाय शाक्तपंथ तर सुरू आहेच आहे. परंतु स्त्रीशिक्षण किंवा विधवाविवाह, या गोष्टींच्या संबंधानें पाहिलें तर त्यावर केवढा कटाक्ष? लागलीच खरमरीत शिव्या, किंवा ग्रामण्यें आणि बहिष्कार. शास्त्रामध्यें जें महापातक ह्मणून सांगितलेलें त्याची स्थिति ही, आणि ज्या केवळ क्षुद्र गोष्टी त्या महापातकवत् मानल्या जात आहेत! हें कसें? तर सांप्रत धर्मव्यवस्था ठीक नाहीं असेंच समजलें पाहिजे, आणि या सर्व गोष्टींविषयीं पोक्त विचार झाला पाहिजे.

५ सहगमन हा एक महत्त्वाचा विषय आहे. बाणभट्टाची कादंबरी पुष्कळांनीं वाचली असेल, नसेल तर या विषयाच्या संबंधानें त्यांत आलेला लेख सर्वांनीं वाचण्याजोगा आहे. कादंबरीमध्यें अशी गोष्ट आहे कीं, कोणी एक बाई पतिमरणकालीं सहगमनास सिद्ध झाली असतां तिला उपदेश करून अनेक ऐतिहासिक वगैरे प्रमाणें देऊन तिचें मन फिरविलें आहे. तिनें सहगमन केलें नाहीं. त्या उपदेशामध्यें "**अविद्वज्जनाचरित एष मार्गः, मोहविलसितमेतत्**" इत्यादिप्रकारें सहगमनाला दोष दिले आहेत. आतां सहगमन हा जर विधि आहे, तर प्राचीनकाळीं देखील अनेक प्रसंगीं तें घडलेलें नाहीं हें कसें? तसेंच बाणभट्टासारख्या विद्वान् पंडितानें या कृत्याला दोष दिले कसे? ह्याचाही विचार करणें अवश्य आहे.

६ मागच्या वेळीं मनूचें "**त्रिंशद्वर्षो वहेत् कन्याम्**" इत्यादि वाक्य सांगितलें होतें. तीस वर्षांच्या पुरुषानें १२ वर्षांच्या कन्येशीं लग्न करावें आणि २४ वर्षांच्या पुरुषानें ८ वर्षांच्या कन्येशीं लग्न करावें, या वर्षांपूर्वीं लग्न केल्यास अधर्म घडतो, असा स्पष्ट नियम आहे. असें असतां आपल्या देशीं कसा प्रचार आहे, हें सांगायाला नकोच. तथापि लोकव्यवहार ह्मणून कोणी याला दोष लावीत नाहीं. हें काय? आणि हें तरी चांगल्याचांगल्या लोकांकडून होतें कसें?

७ व्रतराजामधून रावसाहेब मंडलिक यांनीं होलिकापूजनाच्या ह्मणजे होळीच्या संबंधानें उतारा दिला आहे:— "**अस्मकया भयसंत्रस्तैः**

**कृता त्वं होलि बालिशैः । अतस्त्वां पूजयिष्यामि भूते भूतिप्रदा भव ॥.**" हा एक आमचा मान्य ग्रंथ, यांत होळी हा बालिश पोरांचा खेळ असें ह्मटलें आहे. पण हल्लींचे जे आमच्या मधले शिष्ट तेही हा धर्म ह्मणतात, याला काय करावें ? विचारलें असतां हें शास्त्रांत आहे ह्मणून आह्मीं करितों, वस्तुतः आह्मांस हें नको असें उत्तर येतें; परंतु शास्त्रांत हा प्रकार बालिश असें ह्मटलें आहे याला काय उत्तर ?

आतां या सात मुद्द्यांवरून मी असा अर्थ काढितों कीं, हे जे सर्व नियम ह्मणून आह्मीं ह्मणतों, त्यांमध्यें फेरफार करण्याचा अधिकार आमच्या पूर्वजांनीं चालविला, किंवा ते नियम सर्व काळीं सर्व प्रसंगीं आपल्याला लागू नाहींत अशा समजुतीवर त्यांचें वर्तन होतें. तिसरा पक्ष यासंबंधानें दिसत नाहीं. असें जर आहे तर मग तसाच अधिकार आमच्याकडे कां नाहीं ? आह्मीं हल्लींच्या लोकांनींच काय पातक केलें आहे? आह्मीं इंग्रजांचे दास झालों ह्मणून काय आमचा हा सामाजिक विषयसंबंधी अधिकार देखील निघून गेला ? अशी ही आमची स्थिती कां व्हावी हें कळत नाहीं. कांहीं अंशीं हल्लीं हिंदुधर्मशास्त्राची स्थिती मोठी चमत्कारिक झाली आहे. सर हेन्री मेन् हे ह्मणतात कीं, हिंदूंच्या स्वराज्यकाळीं त्यांच्या धर्मशास्त्राच्या नियमांमध्यें इतकें काठिन्य नव्हतें, इतका ताठपणा नव्हता. परंतु आतां त्याला फार काठिन्य आलें आहे. स्वराज्यांमध्यें ज्या कित्येक गोष्टी सहज होऊन जाण्याजोग्या होत्या, त्यांविषयींच्या अडचणी आतां फार बळकट झाल्या आहेत. ही स्थिति बरी नव्हे, ही मरणतुल्य अवस्था होय. ज्या काळीं धर्मामध्यें जीव होता, त्याकाळीं जी स्मृतिनियमांची स्थिति होती तशीच स्थिति पुनः येईल, तेव्हां धर्म खरोखर जागृत आहे असें ह्मणतां येईल.

"**महाजनो येन गतः स पंथाः**". ज्याप्रमाणें मागील काळचे लोक त्या त्या काळाचा विचार करून चालत आले असें वरील व इतर उदाहरणांवरून स्पष्ट दिसतें, त्याप्रमाणें आतां देश, काल, वर्तमान पाहून चालण्यास आह्मीं मुखत्यार आहों, आणि असेंच आह्मीं चाललें पाहिजे. ह्या गोष्टीला देखील प्रमाण दाखवितां येतें, आणि तें एथें दाखवितों, कारण, रूढिही नको आणि शास्त्रही नको असें जे ह्मणणारे असतील त्यांच्या मारखें आह्मांस करावयाचें नाहीं. पूर्वींचें कांहींएक

चांगलें नाहीं, जुनें तितकें सर्व नान्सेन्स ( Nonsense ), ह्या ह्मणण्याप्रमाणें आह्मांस चालावयाचें नाहीं. शास्त्रकारांनीं जे नियम लिहिले आहेत त्यांतलें बीज काय ? त्यांत हेतु काय? हें शोधून काढण्याचा आह्मीं प्रयत्न केला पाहिजे. त्यांचा हेतु दुसऱ्या कोणत्याही रीतीनें सिद्धीस जाईल किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे. त्या हेतूला जर बाध येत नसला, तर त्यांनीं लिहून ठेविलेल्या रीतीहून भिन्न रीतीनें वर्तन करणें यांत कांहीं दोष नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. याविषयीं मनूचें वाक्य असें आहेः– "**आर्षं धर्मोपदेशं च वेदशास्त्राविरोधिना । यस्तर्केणानुसंधत्ते स धर्मं वेद नेतरः ॥**" ह्मणजे शास्त्र वचनांचें बीज तपासलें पाहिजे, त्याचा तर्काच्या साह्यानें विचार केला पाहिजे, आणि असें जो करतो त्यासच धर्म कळला. "**स धर्मं वेद नेतरः**" असें मनूचें ह्मणणें आहे. शंकराचार्यांचेंही मत असेंच आहे. त्यांनीं आपल्या शारीरकभाष्यांत हें मनुवचन देऊन त्यांतील सिद्धांत खरा आहे असें ह्मटलें आहे. सारांश "**बाबावाक्यं प्रमाणम्**" हें ह्मणणें अगदीं खोटें आहे. कोणताही नियम करण्यामध्यें शास्त्रकर्त्याचा हेतू काय? या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे. हा हेतु जर अन्यरीतीनें सिद्धीस जाण्याजोगा असेल, तर तो नियम वैकल्पिक समजला पाहिजे. ह्मणजे तो विधि पाहिजे तर करावा, नाहीं तर करूं नये अशा अर्थानें घेतला पाहिजे.

याविषयीं दुसरें एक प्रमाण आहे. शाबरभाष्य ह्मणजे मोठा मान्य ग्रंथ आहे. त्याचें सांगणें सर्वांस ग्राह्य असलें पाहिजे, कारण शबर स्वामी ह्मणजे मीमांसासूत्रावरील भाष्यकार. त्या भाष्यांत "**अथातो धर्मजिज्ञासा**" या पहिल्याच सूत्राची व्याख्या करितांना, शबर स्वामी ह्मणतात कीं, "**वेदमधीत्य स्नायात्**" याचा जर केवळ शब्दार्थ घेतला तर वेद ह्मटल्यानंतर लागलेंच स्नान करावें असा होतो; पण असें झालें तर अर्थज्ञानाला सवड नाहीं, कारण कीं, लागलेंच स्नान केलें पाहिजे, ह्मणजे वेदाध्ययनानंतर गुरुकुलाहून परत गेलें पाहिजे. परंतु वेदार्थज्ञानाशिवाय वेदाध्ययन व्यर्थ आहे, ह्मणून शबर स्वामी ह्मणतात कीं, वेदाध्ययनविधीचें तात्पर्य पहा, आणि मग या गोष्टीचा निकाल करा. "**वेदमधीत्य स्नायात्**" या वचनावर "**न च आम्नायो नाम अतिक्रमितव्यः**" अशा केलेल्या शंकेवर, शबर स्वामी ह्मणतातः–"**अति-**

क्रमिष्याम इममाम्नायम्। अनतिक्रामंतो वेदमर्थवंतं संतमनर्थकमवकल्पयेम।" ह्मणजे या आम्नायाचा (वेदवाक्याचा) आह्मी अतिक्रम करणार असेंच शबर स्वामींचें ह्मणणें—आणि तें कां कीं, तसें न केल्यास वेद अर्थवान् असून आह्मीं त्याला अनर्थक केल्यासारिखें होईल. आलीकडील मंडळीपैकीं असें कोणी ह्मटल्यास त्याला लोक नास्तिक ह्मणतील; पण हें वचन आमच्या मान्य व पूज्य भाष्यकारांचें आहे. आतां यांतलें बीज काय? नियमाचा मूळ हेतु पाहिला पाहिजे हेंच. यावर एक व्यावहारिक उदाहरण घ्या. समजा कीं, येथून आपल्याला दर्याकिनाऱ्यावर जावयाचें आहे. कोणी पूज्य गृहस्थ आपल्याला ह्मणतो असे कुंभारतुकड्यावरून जा; पण आपण जर त्या मार्गाला दाटी आहे ह्मणून गिरगांव पोलिसकोर्टाकडून गेलों, तर त्यांत कांहीं पातक नाहीं. त्यांत त्या पूज्य गृहस्थाचा अपमान नाहीं. हाही मार्ग तेथेंच जातो व तोही तेथेंच जातो. अशीच स्थिति आपल्या स्मृतींतील पुष्कळ विधिनिषेधांची आहे. त्या स्मृतींतील शब्दांसच बिलगून बसणें यांत एक स्मृतिकाराचा अपमान आहे; किंवा प्रवासाला जातांना कांहीं वाटेवर पडलें सवरलें तर उचलून घे ह्मणून सांगितलें असतां नोकरानें घोड्याची लीद शालीमध्यें बांधून ठेविली अशी जी गोष्ट आहे, त्या गोष्टींतील नोकराच्या सारखा आपला विचारहीनपणा आहे.

हा जो पक्ष सांगितला याला दुसऱ्या रीतीनें बळकटी येते कीं काय हें पाहूं. याविषयीं मतभेद पडणारच पडणार; परंतु ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे कीं, स्मृतिग्रंथ जे आहेत त्यांचें खरें स्वरूप काय? तें न समजल्यापासून फार चुका होतात. आतां पहिल्यानें स्मृतिस्मृतीमध्यें देशभेद आणि कालभेद आहेत हें ध्यानांत ठेविलें पाहिजे; आणि ही गोष्ट ध्यानांत ठेविली ह्मणजे मग कांहीं अव्यवस्था होत नाहीं. परंतु कालभेद आणि देशभेद जर न मानला तर दोष येतो. कसा तो पहा. याज्ञवल्क्य, कात्यायन हे दोन स्मृतिकार घ्या. यांमध्यें वैयाकरण जो कात्यायन तोच हा स्मृतिकार, यानेंच वेदाची अनुक्रमणिका केली आणि पाणिनीय व्याकरणाचीं वार्तिकें केलीं असें षड्गुरुशिष्य ह्मणतात. आतां पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्यें "पुराणप्रोक्तेषु ब्राह्मणकल्पेषु" असें जें सूत्र आहे, त्यावर कात्यायनाचें वार्तिक "याज्ञवल्क्यादिभ्यः

**प्रतिषेधस्तुल्यकालत्वात्** " असें आहे. त्यावरून कात्यायनाच्या पूर्वी याज्ञवल्क्य होऊन गेला असें सिद्ध होतें; कारण, कात्यायनाच्या समजुतीप्रमाणें याज्ञवल्क्य हा पुराणऋषि. हें कालसंबंधानें झालें. आतां देशभेदासंबंधीं विचार पहा. याज्ञवल्क्य मिथिलेमध्यें जनकराजाचे वेळेस होता हें प्रसिद्ध आहे. आणि कात्यायन हा दाक्षिणात्य किंवा दक्षिणदेशांतला असें पतंजलीच्या भाष्यावरून प्रोफेसर रामकृष्णपंत भांडारकर यांनीं सिद्ध केलें आहे. तेव्हां त्यानें त्या देशाला अनुलक्षून तिकडे लिहिलें, यानें या देशाला अनुलक्षून इकडे लिहिलें, असें आपणाला ह्मणण्यास काय अडचण? चारपांचशें वर्षांमागचे टीकाकार, निबंधकार, जर "**अयं विधिर्युगांतरविषयः**" अशा प्रकारच्या व्यवस्था लावितात, तर याज्ञवल्क्याचा आणि कात्यायनाचा जो देशकालपरत्वें भेद वर दाखविला, तसाच दुसऱ्याही स्मृतिकारांचा असावा, हें समजून घेऊन आणि त्यावर लक्ष देऊन जर सर्वत्र स्मृतींची व्यवस्था लाविली तर त्यांत काय गैर आहे? चारपांचशें वर्षांमागील ग्रंथकार हे महान् पंडित खरे. परंतु ते कांहीं ऋषि नव्हते. एखादा ओनाम्या आणि विद्वान् महापंडित यांच्यांमध्यें जें अंतर तसेंच आमच्यांमध्यें आणि या मोठ्या टीकाकारादिकांमध्यें अंतर, असें आह्मीं कबूल करूं. परंतु जर ते ऋषि नव्हते तर त्यांना स्वतः प्रामाण्य नाहीं. तरी येथें एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे ती ही कीं, मूळ ग्रंथांत कांहीं विधि असतां टीकाकार पंडित जर त्यावर पांडित्य चालवून "**अयं तु युगांतरविषयः**" अशा प्रकारें त्याची व्यवस्था करितात, तर यावरूनच असें दिसतें कीं, निरनिराळ्या स्थळीं निरनिराळ्या काळीं निरनिराळें शास्त्र असणें जरूर आहे, असें त्यांचेंही मत आहे. असो. वर दर्शविलेली जर व्यवस्था कबूल केली, तर शास्त्र पहिल्यानें झालें, आणि मग रूढि झाली, हें जें कित्येकांचें ह्मणणें तें चुकीचें असें ठरेल. जर स्मृति नीट वाचून पाहिल्या, तर माझ्या तर ध्यानांत असें येतें कीं, निरनिराळ्या प्रसंगीं स्मृतींची उत्पत्ति झाली, आणि भिन्नभिन्न देशीं भिन्नभिन्न काळीं जो जो आचार होता, तो तो लेखरूपानें एकत्र करून ठेवल्यावर त्या त्या लेखास स्मृति हें नांव पडलें. नानासाहेब बापट यांनीं मागील खेपेस ह्मटलें तें हेंच. अलिकडच्या जुन्या लोकांची समजूत वेगळी दिसते, प-

रंतु जर शाबर भाष्य चाळून पाहिलें, तर शबर स्वामींचें मत असें आढळतें कीं, जेथें स्मृति दृष्टमूलक असते तेथें स्मृतीवरून श्रुतीचें अनुमान करतां येत नाहीं. कांहीं ठिकाणीं चालू असलेला आचार स्मृतिकारांनीं लिहून ठेविला आहे, इतकेंच तेथें समजावयाचें. अर्थात् स्मृतीला मूळ आचार, ही गोष्ट तो कांहीं अंशीं तरी कबूल करितो, असें झालेंच. ही जर गोष्ट खरी असली, ह्मणजे रूढि किंवा आचार हें स्मृतींचें मूळ, हा पक्ष जर खरा असला, तर त्या स्मृतींच्या नियमांमध्यें आतांच्या काळीं प्रसंगोपात्त फेरबदल करणें हें कांहीं धाडस नाहीं. फेरफार करण्याचें कारण काय? असें ह्मटलें तर त्या काळच्या स्थितीहून आतांची स्थिति भिन्न हें उघड आहे. या विषयीं जर आपण नीट विचार केला तर ही गोष्ट सहज लक्षांत येईल. आणि हा सर्व प्रकार जर खरा आहे, तर स्मृतींच्या नियमांमध्यें फेरफार करणें हें आपणांस जितकें मोठें साहस वाटतें, तितकें मोठें साहस खरोखरी नाहीं अशी आपली खात्री होईल. आणि जर स्मृति नीट वाचून पाहिल्या तर प्रत्येकाची अशीच खात्री होईल यांत संशय नाहीं. यावरून "**महाजनो येन गतः स पंथाः**" असा जो सिद्धांत आहे त्याचें खरें मर्म लक्षांत येतें. शास्त्रनियम पाळावे, जुने आचार पाळावे हें खरें; परंतु त्यांतील बीज समजून घेऊन आणि देश, काल, वर्तमान यांचा तपास करून ते पाळले पाहिजेत, असें लक्षांत येतें. जर असें न केलें, तर शास्त्रकर्त्याचा जो शास्त्र लिहिण्याचा हेतु तो कोणत्याही प्रकारें सिद्धीस जात नाहीं. यास्तव खरे धर्मज्ञ जे आहेत, त्यांनीं योग्यकाळीं त्या नियमांमध्यें फेरफार करावा, आणि सामान्य लोकांनीं त्याप्रमाणें आचार करावा, हें योग्य दिसतें. यांत दुसरी एक गोष्ट आहे ती मात्र लक्षांत घेतली पाहिजे. ती अशी. अमुक एक गोष्ट जुनी ह्मणून एवढ्याच कारणानें ती आपण टाकून देऊं, असें ह्मणणें हें कांहीं चांगलें नाहीं. कालिदासानें जसें ह्मटलें आहे कीं, "**पुराणमित्येव न साधु सर्वम्**" ह्मणजे जुनें तितकें सर्व चांगलें असें ह्मणणें योग्य नाहीं, तसेंच "**पुराणमिति सर्वमेव असाधु**" ह्मणजे जुनें तितकें सर्व वाईट हेंही ह्मणणें योग्य नव्हे. जे कोणी जुनें तितकें वाईट ह्मणणारे आहेत त्यांनीं प्रख्यात **एडमंड बर्क** याचें मत ऐकून घ्यावें. तो मोठा तत्त्ववेत्ता असून

मुत्सद्दी ही होता. जुन्या मंडळींत जसा कालिदासोक्तीला मान मिळाला पाहिजे, तसा नवीन मंडळींत बर्कच्या उक्तीला असावा. त्यानें ह्मटलें आहे:— "Those who do not look backward to antiquity will not look forward to posterity." "ज्यांना आपल्या पूर्वजांनीं काय केलें याची पर्वा नाहीं, त्यांना आपल्या वंशजांचें काय होईल याची पर्वा नसणारच." (टाळी वाजते.)

सारांश कोणत्याही प्रकारें अव्यवस्था होऊं नये. जी कांहीं सुधारणा करावयाची, ती पायाशुद्ध झाली पाहिजे. जें जुनें आहे तेंच पायादाखल धरलें पाहिजे; आणि त्यामध्यें कारणपरत्वें अवश्य वाटेल तितकीच फिरवाफिरव केली पाहिजे. जुनेंच घेऊन आह्मीं बसूं, आह्मांला नवें नको, हेंही ह्मणणें चुकीचें; आणि नवेंच घेऊन आह्मीं चालूं, आह्मांला जुनें नको, हेंही चुकीचेंच. जुन्याच्या पायावरच नवी इमारत बांधली पाहिजे. तरच ती ठीक राहील; तरच ती आज आपल्याला उपयोगी आणि पुढें आपल्या वंशजांनाही उपयोगी पडेल. हा सिद्धांत पूर्णपणें लक्षांत ठेविला पाहिजे.

जर हे सर्व सिद्धांत खरे असले, तर व्यवहारामध्यें याचा केवढा उपयोग व्हावयाजोगा आहे हें पाहूं. आलिकडे स्त्रियांकरितां जी पुण्यास शाळा स्थापिली आहे, तिच्या संबंधानें पुष्कळ वादविवाद चालत असतो. त्यांतील कांहीं ह्मणणें प्रशस्त असतें, कांहीं अप्रशस्त रीतीचें ही असतें. तथापि जुन्या मतांचे अभिमानी ह्मणविणाऱ्यांचें एकंदरीनें अप्रशस्त बोलणें बरेंच आहे. "कायहो! हें सर्व भ्रष्ट प्रकरण आहे, हें विलायती, हें बरें नाहीं" अशा अर्थाचे उद्गार चहूंकडे. तेव्हां ह्या बोलण्यांत अर्थ काय ? प्राचीन इतिहासामध्यें जर पाहिलें, तर मैत्रेयी, गार्गी, इत्यादि ब्रह्मवादिनी स्त्रियांच्या कथा बृहदारण्यादिकामध्यें प्रसिद्ध आहेत. या प्राचीन गोष्टी झाल्या. अर्वाचीन काळाविषयीं या संबंधानें Subjection of women या नांवाच्या ग्रंथामध्यें मिल्लसारखे विद्वान् इतिहासज्ञ ह्मणतात कीं, हिंदुस्थानामध्यें ज्या स्त्रिया राज्यकर्त्या झाल्या त्या सर्वांनीं पुरुषांपेक्षांही चांगल्या प्रकारें राज्य चालविलें. तेव्हां सुलभा, मैत्रेयी, गार्गी, यांच्या वेळेपासून हा अध्ययनाचा प्रकार चालत असतां, हा नवीन मार्ग, हा विलायती पंथ, हें इंग्रजांचें अनुकरण, राज्य

करतें आपल्या बायकांना शिकवितात ह्मणून त्यांची तऱ्हा यांनीं घेतली आहे, इत्यादि प्रकारें जे लोक बोलतात ते कशावरून बोलतात हें मला समजत नाहीं. बरें, कदाचित् ही सर्व रूढीची गोष्ट आहे, तिला शास्त्रसंमति नाहीं, यास्तव हें करूं नये; कारण कीं, शास्त्रविरुद्ध जर रूढि आहे तर ती अज्ञानमूलक, ती टाकून द्यावी, असें जर कोणी ह्मणेल, तर यावर विशेष टीका करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या गोष्टीस शास्त्रही प्रतिकूल नाहीं, आणि पूर्वींचा आचारही प्रतिकूल नाहीं इतकें बस आहे.

आतां आपल्या देशामध्यें हल्लीं स्त्रियांनीं इंग्रजी भाषेचा अभ्यास करावा किंवा नाहीं हा एक प्रश्न येतो, याचा एथें विशेष विचार करण्याची गरज नाहीं. पाहिजे तर करावा, नको तर करूं नये. "**रामो हरिः**" घोकीत बसावें किंवा "ए. बी. सी." करीत बसावें, याचा विचार एथें नको. इतकें मात्र ध्यानांत ठेवावें कीं जर पुरुष इंग्रजी शिकतात तर बायकांनीं शिकूं नये हें ह्मणणें जरा साहसें दिसतें.

आतां दुसरा एक विषय घ्या. बालविवाह व पुनर्विवाह याविषयीं, दिवाण बहादूर रघुनाथराव हे कांहीं दिवसांवर मद्रासेहून आले होते, त्यांनीं एथें गवाळी तळ्यावरील बंगल्यांत सुरस व्याख्यान दिलें. बालविवाहनिषेधाचा पाया त्यांनीं जुन्या शास्त्रावरच बसविला आहे. जुन्या इतिहासामध्यें सीतास्वयंवर, दमयंतीस्वयंवर इत्यादि आख्यानांवरून त्याच पक्षांस बळकटी येते. पूर्वीं प्रौढ वयाच्या कन्यांचींच लग्नें होत असत. परंतु, माझ्या समजुतीप्रमाणें मुसलमानी कारकीर्दीमध्यें हल्लींची वाईट चाल प्रचारांत आली असावी. तेव्हां ही मोडून आपली प्राचीन चाल प्रचारांत आणण्याला अडचण कां असावी ?

पुनर्विवाहाच्या संबंधानें अधिक बोलण्याला वेळ नाहीं. यज्ञेश्वर शास्त्री, तसेच काशीकर पंडित यांच्या मतें हा निषिद्ध आहे. पण जर याला स्मृत्याधार नाहीं तर या ठिकाणीं तर स्मृति एकीकडे ठेवितां येईल. कारण "**एकस्य बह्व्यो जाया भवंति नैकस्या बहवः सहपतयः**" ह्मणजे एकाच बाईला एकाच काळीं एकाहून अधिक पति होत नाहींत, अशी श्रुति आहे. इतिहासामध्यें एका बाईला पांच नवरे असल्याचें द्रौपदीचें उदाहरण आहे, तें असो. या श्रुतींत "**सह-**

पतयः" या सहपदाच्या स्वारस्यास्तव निरनिराळ्या काळीं एकाच स्त्रीला अनेक पति होऊं शकतात असाच गर्भितार्थ दिसतो. आणि या वाक्यांतील पहिल्या भागांतल्या शब्दांवरून याच मतास बळकटी येते. पुनर्विवाह प्रचारांत असल्याविषयीं इतिहासामध्यें दमयंतीची कथा पहा. नळाचें रूपांतर होऊन तो ऋतुपर्ण राजाच्या घरीं जाऊन राहिला तेव्हां त्याला शोधून काढण्याकरितां दमयंतीनें मोठ्या चतुराईनें ऋतुपर्णाकडे मनुष्य पाठविला. त्यानें राजास कळविलें कीं, दमयंती पुनर्विवाह करते, तूं स्वयंवरास जा, अशी खोटी गोष्ट ऋतुपर्णास सांगितली. हेतु काय, तर तितकें अंतर दिलेल्या वेळांत उल्लंघून येणें हें नळावांचून दुसऱ्याच्या साह्यानें व्हावयाचें नाहीं, या करितां जर तो आला तर साह्यकर्ता नळच हें पक्केपणीं सिद्ध होईल. आतां ती गोष्ट ऋतुपर्णाला खरी वाटली, आणि तो स्वयंवरासाठीं निघूनही गेला अशी कथा भारतांत आहे. यावरून शांतपणें जर विचार केला, तर त्या वेळीं स्त्रीपुनर्विवाह निषिद्ध नव्हता, असें स्पष्ट दिसतें. कारण, जर तशी गोष्ट असती, तर ऋतुपर्णानें त्या मनुष्याला हांकून दिलें असतें. तेथें पुष्कळ राजे जमले आहेत, आणि स्वयंवर तिच्या बापाच्याच घरीं होत आहे, ही गोष्ट त्यानें खरी मानिली ती मानिली नसती. हें कर्म अयोग्य असें जर त्याला वाटतें तर त्याविषयीं कांहीं तरी बोलता, आणि तिकडेस न जाता. परंतु तो तिकडे जातो. कांहीं शंका घेत नाहीं. यावरून त्या वेळेस स्त्रीपुनर्विवाहाविषयीं निषेध नव्हता असाच अर्थ निघतो. व्यास, किंवा भारताचा कर्ता, यालाही हें कृत्य निषिद्ध वाटलें नाहीं, याबद्दलही हेंच प्रमाण आहे. पूर्वीं सांगितलें कीं नवीन सुधारणेला आपणाला पाया पाहिजे तो जुना असला पाहिजे. त्या जुन्या पायाला अनुरूप असें वरील काम झालें पाहिजे. तर या प्रकरणांत आपणांस महाजनांचा पाया मिळाला. वेदवाक्यही मिळालें. तेव्हां आणखीं काय पाहिजे?

दुसरा एक अलीकडचा विषय घ्या. आपले तीन बंधु राजकीय कारणाकरितां विलायतेस जाऊन नुकतेच आले, त्यांच्या आचरणांत गैर काय? "द्विजस्याब्धौ तु नौयातुः शोधितस्याप्यसंग्रहः" असें शास्त्र आहे. त्यांना प्रायश्चित्त घेऊन सुद्धां पवित्र करून घेतां येत नाहीं. एथें युरोपीय तीन मैल वगैरे कांहीं नियम चालत नाहीं. कोणी स-

मुद्रांत गलबतावर बसून गेला ह्मणजे पातक घडलें. आतां याबद्दल ऐतिहासिक प्रमाणें काय आहेत पहाः— ऋग्वेदामध्यें भुज्युनांवाचा मनुष्य नौकेमध्यें बसून तीन दिवसांच्या वाटेवर गेला होता. दुसरे लोकही व्यापारी वगैरे जात येत असत अशीं प्रमाणें सांपडतात. असेंच हल्लीं कोकणांतील माणसें मुंबईस गलबतांतून जात येत असतात. बाळगंगाधर शास्त्री, रावसाहेब मंडलिक, प्रोफेसर भांडारकर, हेही याचप्रकारें आले आहेत. यांचा संग्रह कसा?' तेव्हां "**शोधित-स्याप्यसंग्रहः**" या स्मृतींतलें बीज पाहून, आणि जुन्या काळाचा व हल्लींचाही आचार पाहून, विलायतेस जाण्यास अडचण नसावी हाच सिद्धांत ठरतो. ५० मैल आणि ५००० मैल यांत या संबंधानें भेद करतां येत नाहीं.

एथें पुनः जुनें सर्व टाकलें पाहिजे असें नाहीं. पूर्वींचा आणि हल्लींचा सदाचार पाहून जो अनिष्ट प्रकार मध्यें प्रवृत्त झाला तो मात्र टाकला पाहिजे.

आतां दुसरा एकच मुद्दा राहिला आहे, त्याविषयीं बराच अग्नि पेटला आहे. तो कोणता तर जातिद्वेष, जातिमत्सर, हा होय. कांहीं लोकांचें ह्मणणें आहे कीं, जातिभेद आजच्या आज मोडावा, परंतु हें ह्मणणें मला कबूल नाहीं. कारण याचा परिणाम चांगला होणार नाहीं. जोंपर्यंत आचारभेद आहे तोंपर्यंत जातिभेद मोडणें कठीण आहे. परंतु सध्या भिन्नजातींमध्यें जो मत्सर आहे तो आधीं मोडा असें माझें ह्मणणें आहे. (टाळी वाजते.) पुष्कळ जातींमध्यें पूर्वीं जो आचार होता तो आतां कां चालत नाहीं. बाळाजी बाजीराव पेशवे यांनीं देशस्थांची मुलगी केली असें बखरींत लिहिलें आहे. तेव्हां हा आचार आतां कां चालू करूं नये? याच्यामध्यें कांहीं शास्त्राधाराची गरज आहे असें नाहीं. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हेच जुने चार भेद शास्त्रसंमत आहेत. यांच्यामध्यें ज्या भिन्न पोटजाती आहेत त्यांचें ऐक्य होण्यास शास्त्राची काय अडचण?

हें केवळ दिग्दर्शन झालें. या दर एक विषयाच्या संबंधानें व अशाच इतर विषयांच्या संबंधानें स्वतंत्रपणें बोलतां येईल. विशेषेंकरून ध्यानांत ठेवण्याची गोष्ट ही आहे कीं, आपल्या हल्लींच्या स्थितीकडे लक्ष

दिलें पाहिजे. आपल्या लोकांना समागम कोणाचा होत चालला आहे हें पाहिलें पाहिजे. मुसलमान, पारशी, युरोपियन, यहुदी, चिनाई देखील अशा निरनिराळ्या लोकांचा नित्य सहवास होत आहे याचा विचार केला पाहिजे. निरनिराळ्या रीतिभाती, निरनिराळे धर्म, निरनिराळ्या विद्या, निरनिराळे आचार विचार, याप्रमाणें सर्व कांहीं भिन्न; अशा लोकांशीं आपला समागम जडला आहे तो आपल्याला मुळींच तोडतां येत नाहीं. तें सामर्थ्य राहिलें नाहीं. ह्मणून हा समागम कायम असें समजून चाललें पाहिजे. अशा स्थितीमध्यें आपले जुने आचार विचार कायम राहतील अशी आशाही धरतां येत नाहीं. इतर देशांतील इतिहासांवरून, आणि प्रत्यक्ष आपण जें पहातों त्यावरून, ही गोष्ट सहज लक्षांत येण्याजोगी आहे. मुसलमान लोकांच्या सहवासापासून आपल्या सामाजिक स्थितीवर काय परिणाम झाला, तो बंगाल्यांतील स्त्रियांच्या आचारावरून पहावा. या देशांतील स्त्रियांचे आचार, शिवाजी, पेशवे वगैरे यांच्या सामर्थ्याच्या योगेंकरून आपलें राज्य राहिल्यामुळें इतके बदलले नाहींत. कलकत्त्यामध्यें चार महिने मी होतों, परंतु त्या चार महिन्यांत रस्त्यांतून फिरणाऱ्या चार बायका देखील मला दिसल्या नाहींत. तेथील स्त्रिया जेव्हां पालखींत बसून घराबाहेर जातात, तेव्हां पहिल्यानें भोयांनीं पालखी घेऊन आंत आणून ठेवावी, पडदे उघडून आपण बाहेर निघून जावें, नंतर बायकांनीं पालखींत बसावें, पडदे बंद करावे, आणि मग भोयांनीं येऊन पालखी उचलावी, असा प्रघात आहे ह्मणून मला कांहीं स्नेह्यांनीं सांगितलें आहे. पालखींत बसण्याच्या कामीं देखील हे सर्व संस्कार. ती स्थिति येथें नाहीं, याचें कारण काय? तर तेथें मुसलमानांचा अंमल जास्त व एथें कमी हें होय. यावरून असें लक्षांत येईल कीं, जेथें निरनिराळ्या प्रकारच्या लोकांचा समागम तेथें त्या समागमाचा परिणाम व्हायाचाच, असा सृष्टीचा ठरींव नेम आहे.

जर पूर्वी सांगितलेले सिद्धांत कबूल केले, तर आतां सांगितल्याप्रमाणें लोकस्थितीमध्यें जे फेरफार झालेच पाहिजेत, ते आपल्या हातीं राहतील. देश, काल, वर्तमान यांना अनुसरून लोकांचें वर्तन होईल; आणि शास्त्राची जबरदस्ती ह्मणून जी कांहीं लोक मानितात ती नाहींशी

होईल. साधारण समजुतीच्या योगें हीं कार्यें सुरळीत रीतीनें होतील. परंतु जुन्या रूढीशींच सर्वांशीं चिकटून बसावें असा आग्रह धरिला, तर लोकांना ही जबरदस्ती वाटूं लागेल, आणि त्यापासून अव्यवस्था होऊन आपलेंच नुकसान होईल. जर देशकालवर्तमानानुरोधानें रीति बदलल्या, तर सर्व प्रकार साधारणरीतीनें मान्य झाल्यामुळें सर्व धर्माचा ओघ आपल्या आटोक्यांत राहील, आपल्या हातून जाणार नाहीं. व सांप्रत जी अव्यवस्था दिसते ती नाहींशी होईल. फ्रान्स आणि इंग्लंड या देशांच्या स्थितीकडे लक्ष दिल्यानें ही गोष्ट ध्यानांत येणार आहे. फ्रान्स देशामध्यें जेव्हां नवीन मतें उत्पन्न झालीं, तेव्हां ज्या अडचणी आणि जे घोंटाळे झाले, तीच स्थिति सध्या या देशामध्यें होऊं नये हें लक्षांत ठेवलें पाहिजे. फ्रान्स देशामध्यें जीं जुनीं मतें होतीं, तींच कायम ठेवावीं असा कित्येक मोठमोठ्या गृहस्थांनीं आग्रह धरिला, यामुळें मोठा युद्धप्रसंग होऊन या देशाची आणि इतर देशांचीही धुळधाणी झाली. परंतु इंग्लंड देशाची गोष्ट निराळी. सन १८३२ मध्यें तसेंच मागें १६८८ मध्यें मोठमोठ्या उलाढाली झाल्या; परंतु जें कांहीं व्हावयाचें तें बेतानें, आणि दोन्ही पक्षांच्या समजुतीनें, होऊन सर्व देशाची स्थिती कायम ती कायम, इतकेंच नव्हे तर उलटी सुधारलेली अशी झाली. कारण ज्या वेळेस अमुक एक फेरफार करणें अवश्य आहे, असें दिसून येतें, त्या वेळेस इंग्रजलोक फार आग्रह न धरितां ते फेरफार करीत जातात. यामुळें फेरफार करण्याच्या प्रवृत्तीला फार प्रतिबंधापासून उत्पन्न होणारा जोर येत नाहीं, तो वेळच्यावेळीं फेरफार झाल्यानें कमी व क्षीण होऊन जातो. आणि फ्रेंच लोकांच्या घोंटाळ्यासारखा घोंटाळा होत नाहीं.

याप्रमाणें या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, तो घोंटाळा वारण्याला साधन काय काय लागतें हें सहज लक्षांत येईल. जर हें खोटें झटलें, आणि त्या होणाऱ्या फेरफाराला प्रतिबंध सर्वतोपरी कायम ठेविले, तर तो फेरफार होऊन जातोच, तो कांहीं रहात नाहीं, पण त्याच्या जोडीस अव्यवस्था फार होते जर त्याला मदत केली, त्याला वाट दाखविली, तर त्यामध्यें कांहींना कांहीं तरी बरें निपजतें. दुराग्रह आणि हट्ट धरिला, सभोंवतालीं दिसणाऱ्या चिन्हांकडे लक्ष न दिलें, तर मात्र वाईट परिणाम होणारच. ह्मणून ही गोष्ट आपल्या आटोक्यांतून जाऊं

नये, असें ज्यांना वाटत असेल, त्यांनीं मीं सांगितलेले सिद्धांत खरे खोटे याचा नीट व फार पोक्तपणें विचार करावा. असें जर केलें, तरच कांहींतरी चांगली स्थिति येईल, नाहीं तर सर्व आचार विचार संबंधानें अराजक होऊन परिणाम फार वाईट होईल. असें होऊं नये इतकीच माझी इच्छा आहे.

नंतर पुढें अध्यक्षांनीं व्याख्यानकर्त्यांची प्रशंसा करून ज्या लोकांस या विषयाच्या संबंधानें जे कांहीं साधकबाधक विचार कळवावयाचे असतील ते त्यांनीं प्रकट करावे अशी विनंति केली. पुढें वे० शा० सं० **भीमाचार्य** हे बोलूं लागले:—

प्रथमतः, कृष्णांनीं मातुलकन्येसीं विवाह केला ह्मणून देवांनीं केलेलें कृत्य इतरांनीं करावें असें नाहीं. "**न देवचरितं चरेत्** " असें आहे. ह्मणून देवांच्या चांगल्या गोष्टी आपण करूं नयेत असें ही नाहीं. जें विरुद्ध असेल तें मात्र करूं नये. कृष्णांनीं दावाग्निप्राशन केलें, गोवर्द्धनोद्धार केला, हें आपण न पहातां केवळ मातुलकन्याविवाहापुरता त्यांचा आधार दाखविणें हें योग्य नाहीं. आपस्तंब वगैरेचें मत असेंच आहे. मुसलमान, पारशी वगैरे लोकांमध्यें चुलतबहिणीशीं लग्न लावितात, ह्मणून तें उदाहरण आपण घेणें बरें नाहीं. प्राचीन पांच हजार वर्षांपलीकडे इतके निर्बंध नव्हते, कारण त्या वेळीं मनुष्यें इंद्रियनिग्रहानें रहात असत. परंतु आतां तसें उपयोगीं नाहीं. आतां इंद्रियनिग्रह होत नाहीं ह्मणून "**मात्रा स्वस्रा दुहित्रा वा नैकशय्यासनो भवेत् । बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥** " असे नियम करणें प्राप्त झालें. तसेंच, सध्याचे ब्राह्मण ह्मटले ह्मणजे पाश्चात्य, त्यांच्या समोर आह्मीं सर्व शूद्र अशी स्थिति आहे. परंतु त्यांचा उद्योग आणि सदाचार वगैरे आह्मांस घेण्यास कांहीं हरकत नाहीं, तथापि, ते गुदप्रक्षालन करीत नाहींत हा कित्ता आपण घेणें योग्य नाहीं. पंडित जगन्नाथ यांनीं यवनीसमागम केला हें उदाहरण घेऊं नये. ती गोष्ट आपण लक्षांत आणूं नये, तर रसगंगाधर वगैरे जे उत्तम ग्रंथ केले त्याचें उदाहरण आपण घेणें योग्य आहे. द्रोणाचार्य ब्राह्मण असून त्यांनीं क्षत्रियधर्माचें कसें आचरण केलें? तर आतां सुद्धां तीन तीन विद्या करीत असतात, द्रोणाविषयीं तर

**"अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः। इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि॥"** यावरून त्यांचे पाशीं दोन्हीं कर्में होतीं. फक्त क्षात्रकर्मच होतें असें नाहीं. आतां त्यांला क्षात्रधर्म शिकविण्याचें कारण द्रुपदानें केलेला अपमान होय. त्याची खोड मोडण्यासाठीं अर्जुनाला त्यांनीं धनुर्विद्या शिकविली. लढाई वगैरे हे आपद्विषय, केवळ दुराग्रहास्तव तो त्या कृत्यास प्रवृत्त झाला. वस्तुतः राज्यामध्यें त्याला आनंद नव्हता.

काश्मिरी लोक सुरापान करितात यांत त्यांचा मोठेपणा नाहीं. शाक्तमार्ग त्यांच्यांत पुष्कळ आहे. **"पीत्वा पीत्वा पुनः पीत्वा"** इत्यादि वाक्यें आहेत. तरी त्यांचा आधार ग्राह्य नव्हे. **"कवेतद्वामदेव्ये। न कांचनं परिहरेत्"**। इत्यादि कित्येक वामदेव्यव्रतासारखे प्रकार वेदामध्येंही आढळतात. ह्मणून ते ग्राह्य आहेत असें नाहीं. ते नरकास नेणारे असें लिहिलें आहे.

"**न कुर्याद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि**" असें असतां आह्मीं स्वतः शास्त्री असून तो नियम मोडतों असें ह्मटलें. परंतु "न कुर्यात्" इत्यादि केवळ "सोऽरोदीत्", "यद्रोदीत्" इत्यादिकांप्रमाणें अर्थवाद आहेत. प्राचीनकाळीं दुष्टलोकांपासून दूर रहाण्याकरितां त्यांच्या भाषेचाही त्याग करावा असें निर्भरानें सांगितलें आहे. आतां "**शूद्रादपि गृह्णीयात्**" इत्यादि आपत्कालाच्या विधीप्रमाणें यावनीभाषेचा अभ्यास करावा लागतो, तथापि हें कर्म प्रशस्त नव्हे. पूर्वीं मुसलमानांनीं देव फोडिले, मध्यें गराड्यांनीं वगैरे पुनः कांहीं स्थापना केली, हल्लीं इंग्रजीमध्यें हळुहळू घरोघरीं काका मामा, नवरा बायको, इत्यादिकांमध्यें भांडणें लागून, हें व्याड, तें नॉनसेन्स्, असे जुन्या कृत्यांना दोष लागणार आहेतच.

क्षत्रिय त्रिकर्मी, त्यांकडे ब्राह्मण षट्कर्मी यानें अध्ययन केलें हा आपत्कालिक गौण पक्ष होय. विद्यालोप होण्याचे प्रसंगीं असें करावें लागतें, ह्मणून हा प्रशस्त मार्ग नव्हे.

नलदमयंतीस्वयंवर हा क्षात्रधर्म होय, त्यामध्यें मोठमोठ्या कन्या वाढतात हें आश्चर्य नव्हे.

"**अधीत्य स्नायात्**" यावरून वेदाध्ययनानंतर समावर्तन करावें हा अर्थ आहे. मध्यें अवकाश जाऊं नये असें नाहीं. अध्ययनाच्या पूर्वीं

मात्र समावर्तन करूं नये इतकाच अर्थ ग्राह्य. "**भुक्त्वा गच्छति**" ह्मणजे जेवल्यानंतर जातो, पूर्वीं जात नाहीं इतकाच त्याचा अर्थ. भोजनक्रियेनंतर गमनक्रिया अव्यवहित होती असें नाहीं. "अधीत्य" यापासून "**न केवलं अध्ययनम्**" "**अर्थज्ञानपूर्वकं अध्ययनम्**" असें सांग अध्ययन घ्यावयाचें. आतां वैदिक पाठ मात्र करितात तसें नव्हे. सांग अध्ययन असें कुमारिल भट्टानेंच केलें. कुमारिल भट्टाचा बंधु नारायण भट्ट यास त्यानें राजाश्रयानें वाद करण्याकरितां परदेशीं पाठविलें. तेथून आल्यावर त्याला देहांत प्रायश्चित्तच त्यानें सांगितलें. भीतीमुळें त्यानें निंदित कर्म केलें नाहीं.

शिमग्यामध्यें "**बालिशैः**" ("बालकैः" असा माझा पाठ आहे.) मुलांनीं वाईट शब्दांचा उच्चार करून वेडगळ आचरण करणें हें आह्मांस इष्ट नाहीं.

देश, काल, वगैरे विचार कुलधर्माविषयीं ठीक आहेत, शास्त्राविषयीं नाहींत. जीमूतवाहन, वीरमित्रोदय हे देशधर्मप्रसंगीं मात्र भिन्न, परंतु सामान्यशास्त्रधर्मप्रसंगीं एकच.

स्त्रीशिक्षणाविषयीं, "**स्त्रीशूद्रद्विजबंधूनां तत्र ज्ञानेऽधिकारता । ....आहुरुत्तमस्त्रीणां च वैदिके**" असा आधार आहे. यमी, उर्वशी, इंद्रायणी इत्यादिकांचीं उदाहरणें आहेत. "**अहं पुराणं अध्येमि । ऋग् अध्येमि । सामानि अध्येमि ।**" अशीं वाक्यें आहेत. कलीमध्यें उत्तम स्त्रियांना वेदाधिकार आहे.

पुनर्विवाह हा विषय. या विषयीं अमक्यानें अमुक तमक्यानें अमुक ह्मटलें तथापि हा विषय मी येथें सोडून देतों.

एकंदरीमध्यें पाहतां परदेशामध्यें जावें यावें, यंत्रविद्या, आगगाडी, इत्यादि उद्योग करावे हें सर्व सोईप्रमाणें केलें पाहिजे, असें जर यांचें ह्मणणें असेल तर ठीकच आहे. तथापि सर्व गोष्टींमध्यें धर्माचें रक्षण करावें हें मुख्य आहे. प्राचीन धर्म बुडावा अशी व्याख्यानकर्त्यांची इच्छा नाहीं तशी माझीही नाहीं.

शेवटीं इतकेंच सांगणें कीं, ह्या तोंडच्या सुधारणा ठीक आहेत, पण परदेशामध्यें, इंग्लंडामध्यें, फ्रान्समध्यें जाऊन आह्मांला एखादें घर बांधायाला किंवा देऊळ बांधायाला थोडीशी जागा द्या, असें ह्मणून

पहा ह्मणजे धर्मसंबंधी काय अडचणी आहेत त्या तुमच्या लक्षांत येतील. आणि असें होईल तरच ठीक आहे. ( टाळी वाजते.)

रा० **रामचंद्र गोविंद तळवलकर**—आजपर्यंत झालेल्या दोन व्याख्यानांला मी हजर नव्हतों, ह्मणून खेद वाटतो, तथापि मागील खेपेचा गोषवारा आज व्याख्यानकर्त्यांनीं दिलेला ऐकून तितकें समाधान वाटलें. आतां येथें जे वादविवाद होतील ते पूर्ण किंवा संक्षिप्तपणें छापून प्रसिद्ध होतील तर बरें.

शंकराचार्य यांनीं सांप्रत धर्मव्यवस्था करावी तर त्यांच्या हातीं स्वराज्य नाहीं, दिवाणी नाहीं, फौजदारी नाहीं, स्वतंत्रतेच्या विरुद्ध त्यांनीं कांहीं सांगितल्यास कोणी ऐकत नाहीं. तेव्हां अधिकार हातीं ठेवा असें तेलंग ह्मणाले, परंतु ऐकतो कोण? हे काय तेलंगऋषी किंवा मंडलीकऋषी ह्मणतात ह्मणून ऐकतील? पूर्वीं ऋषी वगैरे होते, परंतु आतां देश काळ वर्तमान सर्व बदललें. ज्याचा तो मुखत्यार. प्रजा शिकलेल्या. परक्याचा अमल. तेव्हां हें चालावें कसें? तेव्हां सर्व लोकांना कळेल असा ज्ञानाचा प्रसार करणें इतकेंच हातीं आहे. खरोखरी मी संध्या करितों परंतु तिजपासून फायदा काय हें मला समजत नाहीं. इंदुप्रकाशामध्यें ब्रह्मकर्माविषयीं ११९ विषयांचें पुस्तक छापिलेलें मिळतें, अशी जाहिरात आहे, परंतु त्यांत हेतु काय? त्यांत आहे काय? तो हेतु कसा सिद्धीस जावा? हें शेंकडा पंच्याण्णवांलाही समजत नसेल. यांत शास्त्र असो, रूढि असो, पण त्यांत चांगलें वाईट समजायला त्याचा अर्थ समजला पाहिजे. सध्यां हिंदुधर्मशास्त्र ह्मटलें ह्मणजे तुकारामाचे अभंग, रामदासी श्लोक, हें आहे, असें समजणारे हजारों निघतील. माझें ह्मणणें इतकेंच कीं, जें कांहीं धर्माचें तत्त्व असेल तें थोडक्यांत देशभाषेनें कोणी प्रसिद्ध करील तर फार बरें होईल.

रा० **शिवराम वामन साधले**—दोन तीन विद्वान् बोलले त्यांच्या भाषणांमध्यें माझ्या मनांतील बहुतेक अर्थ येऊन गेला आहे, तथापि जीं भाषणें झालीं त्यांचा मथितार्थ असा दिसतो. प्रत्येक मनुष्याच्या मनामध्यें अडचणी दिसतात, इतक्याविषयीं सर्वांचें एकमत आहे, परंतु हें सर्व मांजराच्या गळ्यांत घांट बांधण्यासारखें आहे. जुन्यांनीं परस्परांचें परस्परांशीं भांडणें सोडावें. हें वाईट नाहीं, परंतु हें व्हावें

कसें? जुनें शास्त्र पाहिजे आणि नवीनांना एकच ग्रंथ नको, लग्न नको, मूर्तिपूजा नको, याप्रमाणें पहातां सर्व शास्त्र नवें करावें लागेल. कोणतें शास्त्र घ्यावयाचें आणि कोणतें नवीन करावयाचें ही पंचाईत आहे. मातुळकन्याविवाहाविषयीं शास्त्र नाहीं तरी अलीकडेस तो करावा असें कित्येकांनीं ठरविलें आहे. तेव्हां एके ठिकाणीं कबूल, दुसरे ठिकाणीं कबूल नाहीं, याची वाट काय?

पुनर्विवाहाची गोष्ट निघाली तर बहिष्कार मिळतो, आणि दारू पिण्याच्या संबंधानें सभा होत नाहीं, याचें कारण इतकेंच कीं दारू पिणाराच्या कृत्याचा कायदेशीर पुरावा होत नाहीं. ह्मणून अबरूनुकसानीच्या फिर्यादिला भ्यावें लागतें. नगरप्रांतामध्यें अशा गोष्टी प्रत्यक्ष घडल्या आहेत. जसा पुनर्विवाह सशास्त्र ह्मणून कित्येक बोलतात त्याप्रमाणेंच दारू पिणें हें सशास्त्र असें ह्मणून उघडपणें जर कोणी दारू पिईल, तर त्यास बहिष्कार पडल्यावांचून राहणार नाहीं. आजकाल प्रत्यक्ष बहिष्कार हा शब्द उच्चारायाला भय वाटतें. कारण कीं, तसें करणाराचा छळ होतो. स्वतः दोन वर्षांचा मला अनुभव आहे. आतां जर पुनर्विवाह प्रचारांत आणायाचा असेल तर धैर्य हेंच मुख्य आहे. शास्त्रांत तो मार्ग आहे किंवा नाहीं हें पाहण्याला वेळ कोठें आहे आणि आह्मांस समजतें कोठें! हें वेदांत आहे, तें वेदांत आहे. "**पीत्वा पीत्वा पुनः पीत्वा**" हें वेदांत आहे ह्मणून कोणीं सांगितलें. "**शूद्रो ब्राह्मणतां याति ब्राह्मणो याति शूद्रताम्**" हें मनूंत आहे असें दयानंदांनीं सांगितलें. तथापि हें काय हें आह्मांला समजत नाहीं. तथापि असें ऐकतों कीं, आचाराप्रमाणें उत्तम, मध्यम, कनिष्ठ हे भेद मनुष्यांमध्यें होतात. जीवाचें रक्षण करणें हा उत्तम मार्ग. कोणी सुरा पितात, कोणी मांस खातात, ह्मणोन ते चांगले असें नाहीं. उत्तम ते उत्तम आणि मध्यम ते मध्यम. मांस न खाणें हें उत्तम. खायाचें तर शास्त्रानें तरी खावें. हें मध्यम. आणि अन्यतः कनिष्ठ. कारण यामध्यें हेतु दिसतो. काश्मीरामध्यें सुरापान आहे तथापि दक्षिणेंतून सुरापान न करणारा जर तेथें गेला तर त्याचा आदर करतात. कलकत्त्यास दांडेकर गेले होते, त्यांनीं सांगितलें कीं, इकडील लोक मांसाहारी नाहींत असें समजून ते यांना मोठेपण देतात. आचारामध्यें फुट होण्याचें तरी कारण हेंच.

द्रौपदीचे पांच पति परंतु असें एकच उदाहरण. एका शास्त्र्याचें तर असें ह्मणणें आहे कीं, भारत हें केवळ पंचतत्वांचें रूपक आहे, यांत प्रत्यक्ष असें कांहींच नव्हतें. आतां द्रौपदीचा विवाह पांच पुरुषांशीं जर खरोखरी झाला असेल, तर तिबेट वगैरे देशांतील लोकांच्या रीतीप्रमाणें मानला पाहिजे. परंतु आपला देश दिवसें दिवस सुधारत चालला आहे, यामुळें एक एक वाईट चाल लोक टाकित चालले, परंतु जर पुनर्विवाह करायाचाच तर शंभर, दोनशें, पांचशें असे लोक एकत्र जमून जर निश्चयानें त्या कृत्यास हात घालतील तर तें सिद्धीस जाईल. त्यांनीं बहिष्काराला भिऊं नये. दुसरे ब्राह्मण करावे, दुसरें देऊळ करावें ह्मणजे सर्व सिद्धीस जाईल. शास्त्राची वाटाघाट करित बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

असो, उत्तममध्यमांच्या दृष्टीनें कांदे खातात ही एक जात, मत्स्य खातात ही एक जात, मांस खातात ही एक जात, ब्रह्मवध करतात ही एक जात, करूं नये तें करतात ही एक जात. असे जातींचे अनेक भेद होतात, आणि ते सतत व्हायाचेच.

स्त्रीशिक्षणाविषयीं लोक कंटाळा करितात ही गोष्ट खरी, कारण कीं, मैत्रेयी वगैरेचें प्रकरण आतांसारखें भयंकर नव्हतें. आतांप्रमाणें त्या स्टाकिंग बुट घालून फिरत नव्हत्या. सारांश यांमध्यें दिसणारा अनुकरणाचा प्रकार हा पाहून लोकांना भय वाटतें. इतकेंच. नाहीं तर वस्तुतः स्त्रीशिक्षणाला कोणी वाईट ह्मणत नाहीं.

दमयंतीच्या द्वितीय स्वयंवराविषयीं विशेष बोलायाला नको. द्वितीय स्वयंवर कसें काय असेल हें पहाण्याकरितां ऋतुपर्ण राजा गेला असेल.

आतां द्रोणाचार्याविषयीं. ब्राह्मणाचे खरे अधिकार तीन. यजन, दान, आणि अध्ययन. बाकीचे तीन चरितार्थाकरितां आहेत. अर्थात् जे कोणी सहाही अधिकार चालवितात, त्यांची योग्यता मोठी."

आतां इंग्रजी शिकणाऱ्या आह्मांसारख्यांना कोणी बोलावित नाहींत. स्वकर्म सोडून जे इंग्रजी शिकूं लागले किंवा दुसरी कांहीं कनिष्ठ मानलेली गोष्ट करूं लागले तर ते त्रिकर्मीच राहतात. आणि यांचीं बाकीचीं तीन कर्में राहून जातात.

पंजाबांतील आयुधजीवी ब्राह्मण हे, इंग्रजी शिकून ब्राह्मण्याचे अभिमानी असल्याप्रमाणें जातीचे मात्र ब्राह्मण. ब्राह्मण्याला तप, श्रुति, योनि या तीन गोष्टी अवश्य आहेत. यांतून एक जर कमी तर तिन्ही नष्ट होतात. याकरितां आचारावरून आपल्या योग्यतेमध्यें न्यूनाधिक्य करणें हें आमचें आह्मींच आपले हातीं करून घेतों.

आतां जातिमत्सर, जातीची उत्पत्ति आचारावरून, हें मागें सांगितलेंच आहे. तर आचाराप्रमाणें जातिभेद होणारच. असें झालेंच पाहिजे. तरच सुधारणा होईल. पूर्वीचें टाकतां येत नाहीं. त्याच पायावर व्यवस्था लावली पाहिजे. हें ही मला संमत आहे. आतां मत्सर एकमेकांचा आहे असें ह्मणणें हें खरें नाहीं. जर तो असला तर तो अलिकडे कित्येक मतलबी लोकांच्या बोलण्यापासून उत्पन्न झाला आहे. इतिहासामध्यें पाहतां शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे मराठ्यांना ब्राह्मणांनीं वाढविलें, ब्राह्मणांना मराठ्यांनीं वाढविलें, याप्रमाणें जातिभेद मनांत न आणतां यवनाच्या विरुद्ध भांडून त्यांनीं जय मिळविला. यावरून पाहतां जातिभेदापासून मोठा नाश झाला आहे असें ह्मणणें हें लोकांच्या मनांत मतलबी लोकांनीं भरविलें आहे.

आतां मत्सर सोडावा असें जर वाटेल तर त्याला आह्मीं अमुक आहों, तो अमुक आहे. याचा वाद न करितां शहाण्याचें शहाणपण कबूल करावें. इंग्लंडामध्यें "वर्किंग क्लासिस्" ह्मणजे शारीर श्रम करणारे लोक यांची स्थिति जितकी वाईट आहे तितकी आमच्या देशांतील कनिष्ट मानिलेल्या लोकांची नाहीं. त्यांचा जितका तिरस्कार तिकडे होतो, तितका इकडे यांचा होत नाहीं. मोरोपंतांनीं तुकारामादिकांना "नमस्ते" ह्मणोन वंदन केलें आहे. हानीच जातीचा असें ह्मणून त्यांना टाकिलें नाहीं.

आतां नगरकर, दीनबंधु वगैरे जे आहेत त्यांच्या समजुतीकरितां इतकेंच सांगतों कीं, तुह्मीं सर्व विद्या करितां आहां, परंतु कोठें तीन चार रुपये मिळवून पळी खटखटावण्याची विद्या ब्राह्मणाच्या हातीं राहिली आहे ती ही तुह्मी काढून घेण्याची इच्छा करूं नका. याविषयीं निराळें व्याख्यान पाहिजे.

आतां होळिकोत्सवाविषयीं— कोणी मोठे अधिकारी, कोणी राजे,

कोणी प्रजा, कोणी श्रीमान्, कोणी गरीब, यांचा नित्यशः बरोबरीच्या नात्यानें मिलाफ होत नाहीं. यास्तव वर्षांतून एक दिवस तरीं सर्वांनीं एकरूप होऊन उच्च नीच भेद लक्षांत न आणतां सारखेपणानें वागावें हें दाखविण्याकरितां होळिकोत्सवांतील धुळीचा खेळ काढला आहे. असें असतां परक्याचे बुद्धीला लागून उगीच एकमेकांचीं उणीवें काढित बसणें हें बरें नाहीं. आह्मी तुमचे वडील, आह्मी तुमचे पुत्र. तुह्मी आमचे वडील तुह्मी आमचे पुत्र. हें लक्षांत ठेवावें. देशाच्या उन्नतीला जातिभेदाची सुधारणा हेंच कारण आहे. त्याशिवाय सुधारणा होणार नाहीं. इंग्लंडामध्यें पन्नास लक्ष लोकांनीं दारू पिण्याची सोडली आणि जे कोणी दारू पितील त्यांना खाणावळींत सुद्धां घ्यावयाचें नाहीं, असा ठराव केला आहे. हें चांगलें कीं वाईट ? जातिभेदाचें मूळ हेंच आहे. आणि हें चालेल तोंपर्यंतच देशाची सुधारणा होण्याची आशा आहे. याकरितां एवढेंच सांगणें कीं, मत्सर टाका ह्मणजे झालें. हिंदुस्थान देशाचें कल्याण करण्याची इच्छा बाळगा आणि त्याप्रमाणें वागा ह्मणजे तुमचें आमचें सर्वांचें कल्याण होईल.

**वे० चिंतामण शास्त्री वऱ्हाडकर**—नवीनांमध्यें काशिनाथपंत हे दिग्गज आहेत. प्राचीनांमध्यें भीमाचार्य हे दिग्गज आहेत. तेव्हां "**अधीत्य स्नायात्**" यामध्यें एकाच्या मतें लागलेंच स्नान करावें, दुसऱ्याच्या मतें अर्थज्ञानाचें ग्रहण करावें. याप्रमाणें किंचित् भेदाचें बोलणें आलें. शास्त्र आणि रूढि यांचा जेथें भेद पडतो तेथें आपत्काल मानल्यानें पुढें धर्मशास्त्राचा अनुगम काय ? धर्मशास्त्राचीं वचनें विरुद्ध, आचार विरुद्ध, येथें करावें कसें ? अनुगम ह्मणून कांहीं नाहीं. मातुळकन्याविवाह हा सदोष आहे. तथापि विवाह झाले आहेत. हें आपत्कालीक. वाजसनेय शाखेमध्यें तर मातुळगोत्रप्रवराची ही कन्या उपयोगाची नाहीं. क्वचित् प्रवरच्चि घेतात. गोत्राची घेत नाहींत. कोठें "**योगाद्रूढिर्बलीयसी.**" योग हा शक्तिग्राहकाविषयीं पंकजशब्दवत्. धर्मशास्त्राच्या विरुद्ध आचार आल्यास "**स्मृतिविरोधे न्यायस्तु बलवान्**" उत्सर्गापवादानें एकवाक्यता. याप्रमाणें धर्मशास्त्राची रीत आहे. अर्थशास्त्र ह्मणजे शुक्र-

नीति वगैरे. श्रुति, स्मृति, यांत श्रुतीचा आधार मोठा. तेव्हां येथें मला संदेह प्राप्त झाला. काशिनाथपंतांचें भाषण हेंही अप्रमाण नाहीं, भीमाचार्यांचेंही नाहीं. "**न एकस्याः सहपतयः**" याचा नारायणाचार्यांनीं विचार केला आहे. वाईट आचार जरी आहे तरी जर तो शास्त्रानें निघतो तर तो करावा. कांहींकांच्या मतें धर्मशास्त्रांचें रूपांतर करावें. आतां तें रूपांतर स्मृतिरूपानें करावें किंवा व्याख्यानरूपानें करावें, असे प्रश्न येतात. मग तशा रीतीनें स्मृति कशीही असली तरी मान्य आहे. "**ऋषयो मंत्रद्रष्टारः**" ह्मणून तेलंगऋषी, मंडलीकऋषी इत्यादि प्रकारें कोणी चेष्टा करणें हें बरोबर नाहीं. काशिनाथपंतांची स्मृति अपूर्व नाहीं, तर निबंधाप्रमाणें जर लावतील तर मान्यच आहे. आतां, आपत्काल आपत्काल असें भीमाचार्यांनीं ह्मटलें,पण सर्वच ठिकाणीं आपत्काल ह्मणतां येत नाहीं. प्राचीन रीतीनें कांहीं व्याख्यान पाहिजे. सर्वार्थचिंतामणीमध्यें "**यत्र माधव हेमाद्री**" असें ह्मटेंल असल्यामुळें मला शंका आली, याचा परिहार करा ह्मणजे झालें एवढीच विनंति आहे.

नंतर रावसाहेब **वामन आबाजी मोडक** ह्मणाले कीं, सात वाजून गेले. एकसारखी मंडळी तीन तास उभी आहे, तथापि पुढें सभा चालविण्याचाच त्यांचा उल्लास दिसतो हें ठीकच आहे. दहा दहा मिनिटें एकेकाचें भाषण होईल असें वाटलें होतें, परंतु तीन तास पर्यंत भाषण चाललें आहे, तथापि दोनचार जणाचेंच भाषण झालें. हा विषय वादग्रस्त आहे. याच्या संबंधानें मला कांहीं बोलायाचें होतें, परंतु आतां अवकाश नाहीं ह्मणून आज बोलत नाहीं. पुढील खेपेस हाच विषय चालवून वादविवाद होईल तर बरें.

शब्दांवर टिप्पणी देण्यांत येईल. शिवाय कवींचें वृत्त, काल व ग्रंथ इत्यादि-यीं अलीकडील शोधावरून लिहिलेली माहिती जागोजाग दिली जाईल.

मालेचे अंक प्रतिमासास एकदां प्रसिद्ध होतील. प्रत्येक अंकांत डेमी अष्टपत्री चीं ९६ पृष्ठें असतील. याची वर्षाची आगाऊ किंमत ६ रुपये. बाहेरगांवचे टपाल हांशील ६ आणे. फुटकळ अंकाची किंमत १० आणे. टपाल $\frac{1}{2}$ आणा.

—या मालेचे प्रथम दोन अंक छापून तयार आहेत. त्यांत राघवचैतन्यकृत महागणपतिस्तोत्र, सटीक; कृत शिवस्तुति; कालिदासकृत श्यामलादंडक; कुलशेखरनृपतिकृत मुकुंदमाला; जगन्नाथपंडितकृत हरी ( सूर्यस्तुति ); शंभुमहाकविकृत राजेंद्रकर्णपूर ( काश्मीराधिपश्रीहर्षदेवस्तुति ); क्षेमेंद्रविरचित लास; जगन्नाथपंडितकृत प्राणाभरण. ( प्राणनारायणराजस्तुति ) सटीक; अप्पयदीक्षितकृत वैराग्य-मंखककविकृत श्रीकंठचरित, जोनराजकृत टीकेसहीत; गोवर्धनाचार्यकृत आर्यासप्तशती, अनंतपं-टीकेसहीत; इतके विषय आले आहेत.

---

## धर्मसिंधु प्राकृत भाषांतरसहित.

लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, श्रीपंढरीक्षेत्रनिवासी विद्वद्वर्य **काशीनाथोपाध्याय** लेला संस्कृत जो **धर्मसिंधु** त्यांत हिंदुलोकांचे सर्व धर्म सांगितले आहेत ते, आबालवृद्धांस सम-गून आह्मी पूर्वी सन १८७४ सालीं त्या ग्रंथाचें प्राकृत भाषांतर करवून छापिला, त्याच्या सर्व प्रति ळें हल्लीं तो पुनः छापण्याचा विचार आहे. या ग्रंथांत विषय कोणकोणते आहेत त्यांची बहुशः सु-हेती आहेच, तथापि कोणास ती पाहिजे असल्यास त्यांणीं आम्हांस लिहून कळवावें म्हणजे ांस सविस्तर माहितीचें छापलेलें लिष्ट पाठवून देऊं.

ळ संस्कृत ग्रंथ सुमारें १३००० असून याचें भाषांतर सुमारें २०००० आहे याचीं पृष्ठें, रायल सांच्याचीं सुमारें ८०० होतील. हा, उत्तम जाड्या कागदांवर चांगल्या टैपांनीं छापून बांधिं-लें मजबूद केलें जाईल.

ग्रंथ अवश्य संग्रहणीय असल्यामुळें सर्वांस घेण्यास सुलभ पडावा ह्मणून याची किंमत आगाऊ म्हणजे मार्च १८८६ पर्यंत पाठविणारांस ३ रु. ठेविली आहे; पुढें जास्त पडेल. बाहेरगांवच्या लोकांस हांशिलाबद्दल १२ आणे जास्त पडतील. पैसा भरणारांनीं मुंबईत निर्णयसागर छापखान्यांत भरावा. वर्गणीदारांस ता० ३१ आगष्ट १८८६ पर्यंत मिळतील.

---

## फुलांची परडी.

राष्ट्रभाषाकाव्यसंग्रह हा बाग; ह्यांत स्वस्थपणें संचार करीत असतां, जागोजाग, अत्यंत मनोरम लहान लहान पद्यपुष्पें आढळलीं, त्यांचा संग्रह ह्या पुस्तकांत केला आहे. ह्यांतलें कोणतेंही पृष्ठ कोणतेंही पद्य वाचावें तर त्यापासून मनास बोध आणि रंजन हीं प्राप्त व्हावीं, आणि महाराष्ट्रका-

त्याविषयीं आवड उत्पन्न व्हावी, अशी योजना केली आहे. तुकाराम, मोरोपंत, वामन, श्रीधर, मुक्त, इत्यादिकांच्या काव्यांतले लहान लहान निवडक निवडक वेंचे ह्यांत घेतले आहेत.. पृष्ठें ६० किंमत आणे; डांकहाशील अर्धा आणा. ह्या महिन्याच्या पंधराव्या तारखेस तयार होईल.

---

## बालबोधाविषयीं नवी व्यवस्था.

---

### मागची हकीकत.

हें मासिक पुस्तक इ० स० १८८१ च्या एप्रिल महिन्यापासून निघूं लागलें. तेव्हां, त्यांत मजकुराचीं पृष्ठें आठ आणि वेष्टणाचीं चार, मिळून बारा पृष्ठें होतीं.

पुढें इ० स० १८८४ च्या एप्रिल महिन्यापासून, बारा पृष्ठें मजकुराचीं, आणि वेगळें रंगीत वेष्टण, असें तें पुस्तक निघूं लागलें.

पुढें इ० स० १८८४ च्या नवंबर महिन्यापासून, "लोक काय बोलतात" हीं दोन पृष्ठें आणखी जोडिलीं. म्हणजे एकंदर मजकुराचीं पृष्ठें आरंभीं आठ होतीं, तीं चौदा होऊन, वर रंगीत वेष्टण वेगळें राहिलें. तरी, त्याची किंमत आजपर्यंत, वर्षाची **अवघी सहा आणे ठेविली.** परंतु, आमच्या अनेक सुज्ञ वर्गणीदारांकडून आम्हांस अशा सूचना आल्या कीं, बालबोधाची किंमत थोडीशी वाढवून त्यामध्ये आणखी मजकूर घालावा, म्हणजे बरें होईल. तीप्रमाणें आतां, पुढच्या वर्षापासून

### नवी व्यवस्था.

सध्या बालबोधांत चौदा पृष्ठें असतात, तीं सहाव्या वर्षापासून म्हणजे इ० स० १८८६ च्या एप्रिल महिन्याच्या अंकापासून चोवीस होतील.

हल्लीं जे विषय त्यामध्यें येतात ते विशेष विस्तृत येत जातील; आणखी, सगळ्या वाचकांस, आणि त्यांत विशेषेंकरून विद्यार्थ्यांस उपयुक्त अशा कांहीं नवीन विषयांची योजना होईल.

आणि वर्षाची वर्गणी **सहा आणे** आहे ती **आठ आणे** होईल. म्हणजे

**पहा**—अगदीं आरंभींच्या मजकुराच्या तिप्पट पृष्ठें करून, किंमत सवापटीहून किंचित् अधिक केली आहे. माल **तिप्पट** आणि मोल **दीडपट**! डांकहांशिलाविषयींचा ठराव पहिला आहे, तोच कायम ठेविला आहे.

ही व्यवस्था पाहून आमचे आश्रयदाते संतुष्ट होतील असा आम्हांस भरंवसा आहे.

---

हीं सर्व पुस्तकें मुंबई काळबादेवीच्या रस्त्यावरील निर्णयसागर छापखान्यांतून मिळतील.

मुक्काम मुंबई. तारीख १<br>माहे फेब्रुअरी सन १८८६.

**जावजी दादाजी,**<br>निर्णयसागर छापखान्याचे मालक.